वाचेंसि अपवाडु । कानासि अनुघाडु ।
पिंडु गरुवा मांकडु । होईल हा ॥ ५६७ ॥

तणाचें बुजवणें । आंदोळे वारेगुणें ।
तैसें येईल कांपणें । सर्वांगासि ॥ ५६८ ॥

पायां पडति वेंगडीं । हात होंति मुरुकुंडी ।
बरवेपण बागडीं । नाचवील हे ॥ ५६९ ॥

मळमूत्रद्वारें । होउनि ठांति खोंकरें ।
नवसियें सूंति येरें । माझां निधनिं ॥ ५७० ॥

देखौनि थूंकील जगु । मरणांचा पडैल पांगु ।
सोइरियां उभगु । हाईल माझा ॥ ५७१ ॥

स्त्रिया ह्मणति विंवसी । बाळें जाति मुसीं ।
किंबहुना चिळसी । पात्र होइन ॥ ५७२ ॥

उभळिचा उजगरा । सेजियां साइलेयां घरा ।
सिणवी ह्मांतारा । बहुतांते हा ॥ ५७३ ॥

ऐसी वृद्धाप्याची खोंचणी । आपणेया तरुणपणीं ।
देखों देखों आणी । मग जो वीटे ॥ ५७४ ॥

ह्मणे पाहे हें होइल । आतां चि भोगितां जाइल ।
मग काइ उरैल । हितालागि ॥ ५७५ ॥

ह्मणुनि नाइकणें पावे । तंव आइकौनि घाली आघवें ।
पंगु नव्हतां जावें । नीकेया स्थाना ॥ ५७६ ॥

दीठि जंव जाये । तंव पाहावें तेतुलें पाहे ।
मूकत्वा आधिं धाये । सुभाषितिं ॥ ५७७ ॥

वाणीला नीट बोलण्याचें सामर्थ्य राहणार नाहीं, कानांनीं ऐकू येणे अवघड
होईल, आणि असा हा शरीराचा पिंड वृद्ध माकडासारखा होईल,

गवताचें बुजगावणें शेतात उभे केलेले असते ते जसें
वाऱ्यानें हालतें. त्याप्रमाणे सर्वांगाला कंप सुरू होईल,

चालतांना पांय वेडेवांकडे पडतील, व हल्लींचा
सुंदरपणा त्या वेळीं सोंगासारखा नाचविला जाईल.

मळमूत्रांचीं द्वारें फुटक्या भांड्यांसारखी वाहत
राहतील. लोक मी मरावे म्हणून नवस करतील.

अशी माझी अवस्था पाहून सर्व लोक माझ्यावर थुंकतील, मरण
कांहीं लवकर स्पर्श करणार नाही व नातलगांना माझा उबग येईल.

बायका मला पिशाच्च म्हणतील, मला पाहून मुलांना मूर्च्छा
येईल; काय सांगावें ! मी सर्वांच्या किळसेला पात्र होईन.

शेजारच्या घरीं झोपलेल्या माणसांना माझ्या खोकल्याच्या ढांसेने होणाऱ्या
जागरणामुळें, ते म्हणतील, कीं हा म्हातारा पुष्कळांना त्रास देईल असे ते म्हणतील,

अशी ही म्हातारपणाची सूचना आपल्या तरुणपणातच तो
पाहतो, आणि मग जो त्याविषयीं मनांत अगदीं वीट घेतो;

व असें म्हणतो कीं, पुढें आपल्यास म्हातारपण येईल, मी आता
जे सुख भोगतो ते जाणार ! मग स्वहितासाठीं उरलेच काय ?

म्हणून, जो पर्यंत बहिरेपण आलें नाहीं, तोंच सगळे हरीचे गुण
ऐकून घेतो. पांगळे झालों नाहीं, तोपर्यंत तीर्थयात्रा करून घेतो,

डोळें कमी झाले नाहीत तोपर्यंत जे काही पाहण्यासारखे आहे ते पाहून
घेतो. आणि वाचा बंद होण्यापूर्वी ईश्वराचे गुणानुवांद गाऊन घेतो,

हात होतील खुळे । हें पुढैल मोटकें कळे ।
तंव करुनि घाली सकळें । दयादिकें ॥ ५७८ ॥

मन होइल वेडें । ऐसिये दशे पुढें ।
चिंतौनि ठेवी चोखडें । अदृष्ट जो ॥ ५७९ ॥

जैसें चोर पाहे झोंबती । तंव आजी चि रुसिजे संपत्ती ।
झांकाझांकि कीजे वाति । न वचतां चि ॥ ५८० ॥

तैसें वृद्धाप्यें थावें । मग जें वायां जावें ।
तें आपणपेयां आघवें । सोवतें करी ॥ ५८१ ॥

आतां मोडुनु वसविलीं दुर्गें । कां वळित धरिलें खंगें ।
तेथ उफकेन जो रिगे । तो नागवला ॥ ५८२ ॥

तैसें वृद्धाप्य होये । आलेपणें वायां जाये ।
जें तो शतवृद्धु आहे । नेणों कैंचा ॥ ५८३ ॥

झाडिलीं कोळें झाडी । तेया न फळें चि जेवि बोंडीं ।
जाला आगि तरि राखौंडीं । जाळील काई ॥ ५८४ ॥

ह्मणुनि वृद्धाप्याचेनि आठवें । वृद्धाप्यें जो न नगवे ।
तेयाचां ठांइं जाणावें । ज्ञान आहे ॥ ५८५ ॥

तैसे चि नाना रोग । पडिघांति पुढां आंग ।
तंव आरोग्यतेचे उपेग । करूनि घाली ॥ ५८६ ॥

सांपाचां तोंडीं । जे पडिलें सकूडी ।
ते लाउनियां सांडी । बुद्धिवंत ॥ ५८७ ॥

तैसा वियोगु जेणें दुःखें । विपत्ति शोकु पोखे ।
तें स्नेह सांडौनि सुखें । उदासु जो होए ॥ ५८८ ॥



पुढें आपले हात लुळे होतील हें ओळखून, ते शाबूत आहेत
तोपर्यंत दानादिक सर्व पुण्यकृत्यें त्यांच्याकडून करवून घेतो,

तेव्हां उद्या अशी ही केविलवाणी दशा उद्भवेल, तेव्हां चित्त अगदीं वेडें
होऊन जाईल, म्हणून तोपर्यंत आत्मज्ञानाचा पूर्ण विचार करून ठेवतो,

उद्यां आपल्यास चोर लुटतील तर आजकच संपत्तीचा विनियोग
करुन टाकावाअथवा दिवा गेला नाहीं तोंच झाकपाक करून ठेवावी;

त्याप्रमाणे वृद्धपण येईल आणि मग सर्व काही व्यर्थ फुकट जाईल,
तेव्हां या शरीरापासून निर्लेप राहाण्याला आतांच आरंभ करणें, हें योग्य.

वाटेने चालताना वळणावर किल्ला दिसला, अशा ठिकाणीं, पक्षी आपल्या घरट्यांकडे
परत फिरण्याच्या वेळीं जो वाटसरू त्या किल्ल्याचा आश्रय घेईल तो सुरक्षितच राहील,

तसें, म्हातारपण येईल व जन्माला आलेपण व्यर्थ जाईल; मग तो
शतायुषी असला तरी त्यांत काय अर्थ आहे, हें समजत नाहीं.

तिळाचीं बोंडें एकदां झाडलीं, कीं ती पुन्हा झाडलीं तरी जसे तीळ
सापडायचें नाहींत, अथवा राख झाल्यावर मग पुन्हा अग्नी कसा जाळील ?

म्हणून आपल्याला पुढे वृद्धापकाल येईल असें जाणून जो वार्धक्याने
ग्रस्त होत नाही, त्या पुरुषाच्या ठिकाणी खरें ज्ञान आहे, असें जाणावें.

पुढे नाना व्याधी अंगी जडतील याचा विचार करून, ते रोग
येण्याआधींच तोंपर्यंतच अरोग्य राहण्याकरितां उपाय करितो.

ज्यांप्रमाणे शहाणा पुरुष सापाच्या तोंडात
पडलेला पिठाचा गोळा तो टाकून देतो;

त्याप्रमाणे ज्या प्रेमामुळे वियोग झाला असता दुःख, विपत्ती व शोक प्राप्त होतात,
तो स्नेह टाकून जो समाधानवृत्ती ठेवून सावधपणे, उदासीनपणे दूर करतो.

आणि जेणें जेणें कडे । दोष सूंतील तोंडें ।
तिये कर्मरंध्रीं गुंडे । नियमाचे दाटी ॥ ५८९ ॥

ऐसीऐसीया आइती । जेयाची परि असती ।
तो ज्ञानसंपत्ती । गोसांवि गा ॥ ५९० ॥

आतां आणिक ही एक । लक्षण अलौलिक ।
सांघैन आइक । धनंजया ॥ ५९१ ॥

आणि ज्या इंद्रियांच्या द्वारानें दोष आपलीं तोंडें आंत शिरकावूं पाहातात,
त्या इंद्रियांच्या छिद्रांमध्यें नियमांचे धोंडे बसवून तीं तो बंद करतो,

अशा प्रकारे ज्याची सर्व मनोभूमिका तयार झालेली
असते तो एकटाच ज्ञानसंपत्तीचा स्वामी आहे, असें समज.

आतां अर्जुना, ज्ञानाचें आणिक एक
अलौकिक लक्षण सांगतों, तें ऐक.

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ १० ॥

असक्ति, अनभिष्वङ्गः, पुत्रदारगृहादिषु,
नित्यम्, च, समचित्तत्वम्, इष्ट, आनिष्ट, उपपत्तिषु

देहासंबंधीं अनासक्ती, स्त्री, पुत्र, घर इत्यादींविषयीं लोलुप नसणें, आणि
इष्ट अथवा अनिष्ट कांहीं प्राप्तझालें तरी चित्ताचें समत्व कधींही ढळूं न देणे,

तरि गृहपरिग्रहावरि । उदासु इयापरिं ।
उखिता जैसा बिढारीं । बैसविला असे ॥ ५९२ ॥

कां झाडांची साउली । वाटे जांतां मिनली ।
घरावरि तेतुली । आस्था जेया ॥ ५९३ ॥

साउली सरिसी चि असे । परि असो हें नेणिजे जैसें ।
स्त्रियेचें तैसें । लागतें जेया ॥ ५९४ ॥

आणि प्रजा जे जाली । ते वसती चि कीर आली ।
कां गौरवें बैसलीं । रुंखातळिं ॥ ५९५ ॥

जो संपतीमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता ।
जैसा कां वाटे जाता । साक्षी ठेविला ॥ ५९६ ॥

किंबहूना पूंसा । पांजरेयामाझि जैसा ।
वेदाज्ञेसि तैसा । भीउनु असे ॥ ५९७ ॥

वाटसरू तात्पुरता एखाद्या घराच्या आश्रयाला आला तरी तो त्या घरावर
आसक्त होत नाही, त्याप्रमाणेंच जो या देहाचे ठिकाणी उदासीनाप्रमाणे असतो,

वाटेनें जातांना एखाद्या झाडाची सांवली आढळली, तर कोणी
आस्था बाळगीत नाही, तसे त्याचे घरावरील ममत्व शून्य असते.

आपली सांवली आपल्याबरोबरच नेहमीं असते; तरी आपण तिचे भान
सतत ठेवीत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या मनात स्त्रियेविषयी आसक्ती नसते,

बरें, संतती म्हणजे ज्याप्रमाणें वस्तीला आलेल्या वांटसरूंप्रमाणें
मानतो अथवा झाडाखालीं बसलेल्या गुरांसंबंधीं झाड जसे उदास असतें.

अर्जुना, संपत्तीच्या राशीवर लोळत असतांही त्या विषयीं जसा अनासक्त असतो,
तसा जो केवळ वाटेंने जाणाऱ्या तिऱ्हाइताप्रमाणें तिचा साक्षीमात्र असतो;

किंबहुना पिंजऱ्यामध्ये राघू जसा राहतो,
त्याप्रमाणे जो वेदांचे उल्लंघन करीत नाहीं;

यऱ्हवि दारां गृहपुत्रीं । नाहिं जेयाची मैत्री ।
तो जाण धात्री । ज्ञानाची गा ॥ ५९८ ॥

बाकी स्त्री, घर, पुत्र, यांच्याविषयीं ज्याच्या मनात
आसक्ती नाही, तो ज्ञानाचें अधिष्ठान आहे असें जाण.

आणि महासिंधु जैसा । ग्रीष्मवर्षा सरिसा ।
इष्टांनिष्टां तैसा । जेयाचां ठांइं ॥ ५९९ ॥

उन्हाळ्यांत किंवा पावसाळ्यांत जसे महासागर सारखेच तुडुंब असतात,
त्याप्रमाणे इष्ट किंवा अनिष्ट याचा भेदभाव त्याच्या ठिकाणी नसतो.

कां तीन्ही काळ होतां । त्रिधा न्हवे चि सविता ।
तैसा सुखदुःखिं चित्ता । भेदु नाहिं ॥ ६०० ॥

किंवा सकाळ, दुपार, संध्याकाळ, या तिन्ही वेळांमध्यें सूर्य जसा त्रिविध
होत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या मनाला सुखदुःखापासून खेद होत नाहीं,

जेथ नभाचेनि पाडें । समत्वा उणें न पडे ।
तेथ गा ज्ञान जोडे । जातखेऊँ ॥ ६०१ ॥

आकाशात जसे समत्व कायम असते, तसा जो प्रिय वा अप्रिय घटनांस
समत्वानें सामोरा जातो, त्याच्या ठिकाणीं मूर्तिमंत ज्ञान आहे असें तूं समज.

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचरिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ ११ ॥

मयि, च, अनन्ययोगेन, भक्तिः, अव्यभिचारिणी,
विविक्त, देश, सेवित्वम्, अरतिः जनसंसदि

आणि माझ्या ठिकाणीं अनन्यभावेंकरून निर्दोष भक्ती असणें, पवित्र व निर्मळ
अशा एकान्त प्रदेशामध्यें राहणे आणि जनसमुदायाचा कंटाळा करणे,

आणि मीवांचुनु काहिं । गोमटें जेया नाहिं ।
ऐसा समो तिहिं । निश्चयाचा केला ॥ ६०२ ॥

एका माझ्या सगुणस्वरूपावाचून दुसरे कोठेच सुख नाही,
असा ज्यानें कायावांचामनेंकरून निश्चय केला आहे

शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचे कोश ।
एक मीवांचूनि वास । न पाहावेया ॥ ६०३ ॥

ज्याचे शरीर, वाचा आणि मन ह्या तिघांनीं प्रतिज्ञापूर्वक शपथ
घेतली आहे कीं, या जगात माझ्यावांचून दुसरें कांहीं नाहीं,

किंबहुना निज । जेयाचें जालें मज ।
जेणें आपणेयां आह्मां सेज । येकि केली ॥ ६०४ ॥

फार काय सांगायचे ! ज्याचें अंतःकरण निरंतर माझ्या सानिध्य
असल्या मुळे त्यानें आपलें व आमचें एक अंथरूण केलें आहे.

रिगतां वल्लभापुढें । नाहिं जीविं सांकडें ।
तिये कांतेचेनि पाडें । एकसरे जो ॥ ६०५ ॥

ज्याप्रमाणे आपले पतीशी समागम करण्यास धर्मपत्नीला काही
अवघड वाटत नाही तसा तो निःसंकोचपणे मजशी एकरूप होतो.

मिळौनि मिळत चि असे । समुद्रिं गंगापय जैसें ।
मी होउनि मातें तैसें । सर्वस्व दे ॥ ६०६ ॥

ज्याप्रमाणे गंगेचे पाणी समुद्रास मिळाल्यानंतरही ते निरंतर मिळतच राहते,
तसे माझें ऐक्य पावल्यावरही जे सर्व प्रकारे माझें भजन करीत असतात.

सूर्याचा होणां होइजे । सूर्यासवें जाइजे ।
हें विकलेपण साजे । प्रभे जेवि ॥ ६०७ ॥

पैं पाणियांचिये भूमिके । पाणी चि तळपे कवतिकें ।
ते लहरी ह्मणति लौकीकें । यऱ्हवि पाणी चि तें ॥ ६०८ ॥

जो अनन्यु तियापरी । मी जालां हिं मातें वरी ।
तो ते मूर्त्ति धरी । ज्ञानाची येथ ॥ ६०९ ॥

आणि तीर्थें तटें । तपोवनें चोखटें ।
आवडति कपाटें । वसों जिया ॥ ६१० ॥

शैलकक्षाचीं कंदरें । जळाशयपरिकरें ।
अधिष्टी जो आदरें । नगरा न ए ॥ ६११ ॥

बहू एकांतावरि प्रीति । जेया जनपदाची खंतीं ।
जाण मानुषी मूर्त्ति । ज्ञान चि तो ॥ ६१२ ॥

आणिक ही पुडुतीं । चिन्ह गा सुमती ।
ज्ञानाचिये निरुती- । लागीं सांघों ॥ ६१३ ॥

सूर्याच्या उदयाबरोबर प्रकट व्हावें व सूर्य अस्तास गेला
असता आपण नाहीशे व्हावे, हे ऐक्य जसें सूर्य प्रभेसच शोभतें,

आणि पाण्यांच्या पृष्टभागावर पाण्याला सहज उसळी आली म्हणजे पाहाणारे
त्याला कौतुकानें लाटा असें म्हणतात; पण ते खरोखर पाणीच असते.

तसा जो माझ्याशी अनन्य असतो, व मद्रूप होऊनही
माझीच उपासना करतो, अर्जुना, तोच तो मूर्तिमंत ज्ञान होय.

आणि ज्या पुरुषाला तीर्थे, पवित्र नद्यांची तीरें, शुद्ध स्थानी,
तपोवनात, डोंगराच्या गुहांत अशा ठिकाणीं राहाण्याची आवड असते;

पर्वताच्या गुहा व सरोवरांची तीरें यांच्याजवळ एकांतस्थान, या
ठिकाणीं राहावयाची ज्याला फार आवड तो शहराच्या गर्दीत येत नाही.

ज्याला एकांतवासाची फार आवड असते, आणि मनुष्य
वस्तीचा कंटाळा, तो ज्ञानाची मनुष्यरूपी मूर्तीच होय.

हे बुद्धिमान अर्जुना, ज्ञानाचे नीट स्पष्टीकरण व्हावें
म्हणुन पुन्हा आणखी कांही लक्षणे सांगतो, ऐक.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ १२ ॥

अध्यात्म, ज्ञान, नित्यत्वम्, तत्त्वज्ञान, अर्थ, दर्शनम्,
एतत्, ज्ञानम्, इति, प्रोक्तम्, अज्ञानम्, यत्, अतः, अन्यथा

अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धी असणें, व झालेल्या आत्मज्ञानाने परमात्म
साक्षात्कार होणे, या सर्वाला ज्ञान असें म्हणतात. याहून जे विपरीत ते अज्ञान होय,

तरि परमात्मा ऐसें । जें एकि वस्तु असे ।
तें जेया असे । ज्ञानातव ॥ ६१४ ॥

तें एकवांचूनि आनें । जिये भवस्वर्गादि ज्ञानें ।
तें अज्ञान ऐसें मनें । निश्चयो करी ॥ ६१५ ॥

परमात्मा म्हणून जी एकमेवाद्वितीय वस्तू
आहे, ती ज्या ज्ञानामुळे अनुभवाला येते,

त्या एका ज्ञानाशिवाय, इतर जीं स्वर्ग व संसार यांसंबाधांची
ज्ञानें आहेत, ती अज्ञानानेंच आहेत, असा तो मनी निश्चय करतो.

स्वर्गु जीणावा हें सांडी । भवविषिं कान अडि ।
दे अध्यात्मज्ञानिं बुडी । सद्भावेंसिं ॥ ६१६ ॥

भंगलिये वाटे । शोधूनियां अव्हांटे ।
निगिजे जेवि नीटें । राजपंथें ॥ ६१७ ॥

तैसें अज्ञानजात करी । पण आघवें चि एकीकडे सारी ।
मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानिं ॥ ६१८ ॥

ह्मणे हें चि एक आथि । एर जाणणें ते भ्रांति ।
ऐसा निष्कर्षी मति । मेरु होये ॥ ६१९ ॥

येवं निश्चयो जेयाचा । द्वारिं अध्यात्मज्ञानाचां ।
ध्रुवो देवो गगनिचा । तैसा राहला ॥ ६२० ॥

तेयाचां ठांइं ज्ञान । या बोला ह्मणसी व्यवधान ।
जें ज्ञानिं बैसलें मन । तेव्हां चि तो तें ॥ ६२१ ॥

तरि बैसलेपणें जें होये । तें बैसतां चि वेळिं नोहे ।
तऱ्हीं ज्ञाना तेया आहे । सरिसा पाडु ॥ ६२२ ॥

आणि तत्वज्ञान निर्मळ । विये जें एक फळ ।
ते ज्ञेय हिं वरि सरळ । दीठि जेयाची ॥ ६२३ ॥

यऱ्हवीं बोधा आलेनि ज्ञानें । जरि ज्ञेय न दिसे चि मनें ।
तरि ज्ञानलाभु ही न मने । जाला सांता ॥ ६२४ ॥

आंधळेनि हातिं दिवा । घेउनि काये करावा ।
तैसा ज्ञाननिश्चयो आघवा । वायां जाए ॥ ६२५ ॥

परि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्विं दीठि जैं बैसे ।
ते स्फूर्त्ति असे । अंध होउनि ॥ ६२६ ॥

तो स्वर्गास जाण्याची इच्छा सोडून देतो, आणि संसारासंबंधीं कानांवर गोष्ट
येऊं देत नाहीं आणि केवळ निर्मळ भावनेनें अध्यात्मज्ञानांत निमग्न होतो;

निरनिराळे रस्ते फुटलेल्या वाटेवर, पुढें आडमार्ग कोणते आहेत,
याची चौकशी करून व योग्य मार्ग निवडून सरळ राजमार्गानें जातो,

तसेच हा ज्ञानी मनुष्य, आत्मज्ञानाचा नक्की मार्ग कोणता हे पारखून, इतर
मार्ग एकीकडे सारतो, आपले ज्ञान व बुद्धी अध्यात्मज्ञानाकडेसच लावतो,

तो म्हणतो कीं, हें आत्मज्ञान हेंच एक खरें आहे इतर कोणत्याही विषयांचे ज्ञान
म्हणजे निव्वळ भ्रम, अशी ज्याची शेवटी मेरुप्रमाणे दृढ अचल बुद्धी होऊन राहते.

अशा प्रकारे आकाशांतील ध्रुवनक्षत्राप्रमाणें ज्याचा
निर्धार आत्मज्ञानाच्या द्वारात अचळ राहिलेला आहे.

त्याच्या ठिकाणी ज्ञान असते या बोलण्यात काहीही चूक नाही. कारण
जेव्हां त्याचें मन ज्ञानांत स्थिर झालें, तेव्हाच तो ज्ञानस्वरूप झाला.

तरी पुरुषाची मती ज्ञानांत स्थिर झाल्याबरोबर त्याला जी स्थिती येते, ती ज्ञानामध्यें
मती स्थिरहोते वेळीं असतें, असें नाहीं. पण ती जवळ जवळ पूर्ण ज्ञानवंतासारखीच असते,

आणि तत्त्वज्ञानापासून जें एक फल प्राप्त होतें, तें फल म्हणजे
ज्ञेय होय. त्या थेट ज्ञेयापर्यंत ज्याची दृष्टी नीट जाऊन भिडते;

नाहीं तर, ज्ञानबोध झाला असतांही जर ज्ञेय हातीं लागलें
नाहीं, तर ज्ञानाचा लाभ होऊनही न झाल्याप्रमाणें आहे !

आंधळ्याने हाती दिवा घेतला असता त्याचा काय उपयोग ? तसेंच
जर ज्ञेय दृष्टीला पडलें नाहीं, तर सगळा ज्ञाननिश्चय व्यर्थच जातो.

जर ज्ञानाच्या प्रकाशानें दृष्टी परतत्त्वात प्रविष्ट होत नसेल,
तर ती ज्ञानस्फूर्तीच अंध होऊन राहिली आहे असे होईल,

ह्मणुनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तु अघवी ।
देखे ऐसी होआवी । बुद्धि चोख ॥ ६२७ ॥

यालागि ज्ञानें निर्दोषें । दाविलें ज्ञेय देखे ।
तैसेनि उन्मेखें । आथिला जो ॥ ६२८ ॥

जेवढी ज्ञानाची उधि । तव्हडी चि तेयाची बुद्धि ।
तो ज्ञान हे शाब्दि । करणें न लगे ॥ ६२९ ॥

पैं ज्ञानाचिये प्रभेसवें । जेयाची मति पावे ।
हातधरणियां सीवे । परतत्वातें ॥ ६३० ॥

तो चि ज्ञान हें बोलतां । विस्मो कोणु पांडुसुता ।
कां सवितेयातें सविता । ह्मणावें असे ॥ ६३१ ॥

तंव श्रोतां ह्मणितलें असो । न संघैं देवाचा अतिसो ।
ग्रंथउत्कंठे आडसो । घालिसी कां ॥ ६३२ ॥

तूझा हा चि आह्मां थोरु । वक्तृत्वाचा उपकारु ।
जे ज्ञानाविषो फारु । ऊपदेशिला ॥ ६३३ ॥

रसु न व्हावा अतिमात्रु । हा घेतासि कविमंतृ ।
तरि अवंतुनु शत्रु । करितासि गा ॥ ६३४ ॥

ठांइं बैसतिये वेळे । जे रससोये घेउनि पळे ।
तियेचा येरु वोडौ मिळे । कोणा अर्था ॥ ६३५ ॥

आघवा चि विषिं भादि । परि सांजवणीं टेंकों नोदी ।
ते खुरथोडी नसुधी । पोसी कवण ॥ ६३६ ॥

तैसी ज्ञानीं मति न फांके । येरें जल्पति नेणों केतुकें ।
परि तें असो नीकें । केलें तुवा ॥ ६३७ ॥



म्हणून ज्ञान जेवढें दाखवील तितकी सर्व ज्ञेय
वस्तूच असते, इतका निर्मळपणा बुद्धीला आला पाहजे.

म्हणून शुद्ध ज्ञानाने दाखविलेले ज्ञेयरूप दृष्टीस पडते,
त्याला निर्दोष ज्ञानानें दाखविलेले पर तत्त्व दिसतें;

जेवढा ज्ञानाचा विकास आहे, तेवढाच ज्याच्या बुद्धीचा विकास झालेला
आहे, मग तो पुरुष ज्ञानस्वरूप होतो, हें शब्दानें सांगावयास नको.

ज्ञानाच्या प्रकाशाबरोबर ज्याची प्रज्ञा ब्रह्मामध्ये
झेप घेते तो परब्रह्माला हातोहात जाऊन भेटतो.

अर्जुना, तोच ज्ञानरूप आहे असें म्हटलें असतां त्यांत आश्चर्य
तें काय आहे ? हा केवळ सूर्यच आहे, असे सूर्याला म्हणावे लागते ?

यावर श्रोते म्हणाले, हे असू दे, आतां ज्ञानाविषयी अधिक स्पष्टीकरण
करण्याचें कारण नाही, उगीच ग्रंथ निरूपणांत हा अडथळा का आणतोस ?

आत्मज्ञानाचा विषय तूं पुष्कळ विस्तारानें सांगितलास,
हा तुझे वक्तृत्वाचा आम्हांस मोठा लाभ झाला !

रसाळपणाची रेलचेल असावी, हा कविजनांचा मंत्र तूं घेतला आहेस, तर
मग आम्हांला आमंत्रण देऊन, आता आमच्याशी शत्रू सारखे का करतोस ?

भोजन करण्यास पात्रावर बसावयाच्या वेळीं, जी बाई शिजवलेले
अन्न घेऊन पळते, तिच्या इतर आदरसत्काराचा काय उपयोग ?

सर्व गुणांनीं युक्त असूनही जी दूध काढायला बसलें, कीं कांसेला
हात लावून देत नाहीं, ती लाथाळ गाय नुसती कोण बरे पोसेल ?

त्याप्रमाणें, ज्ञानाविषयी न बोलता इतरच वायफळ गोष्टीचे वर्णन
करतात, तसे तूं न करतां तुझें निरूपण मात्र फारच चांगलें झालें,

जेया ज्ञानलेसादोसें । कीजति योगातिसायासें ।
तें धणिचें आणि तूझेया ऐसें । केलें निरोपण ॥ ६३८ ॥

अमृताची सातवाकडी । लागो कां अनुघाडी ।
सुखाचे दीस कोडी । गणिजतु कां ॥ ६३९ ॥

पूर्णचंद्रेंसिं राति । युग एक असौनि पांति ।
तरि काय पाहातांति । चकोर ते ॥ ६४० ॥

तैसें ज्ञानाचें बोलणें । आणि येणें रसाळपणें ।
आतां पुरे कोण ह्मणे । आकर्णितां ॥ ६४१ ॥

आणि सभाग्यु पाहुणा ये । सुभगाची वाढती होये ।
तैं सरों नये रससोए । ऐसें आथि ॥ ६४२ ॥

तैसा घडला प्रसंगु । ज्ञानिं आह्मां लागु ।
आणि तुज ही अनुरागु । आथि येथ ॥ ६४३ ॥

ह्मणौनि यया वाखाणा- । पाठि सेइली चौगुणा ।
ना ह्मणों न येंसि देखणा । होंसि ज्ञानी ॥ ६४४ ॥

तरि आतां यावरि । प्रज्ञेचा माजु धरिं ।
पद साहसिं करिं । निरोपण ॥ ६४५ ॥

या संतवाक्यासरिसें । जी ह्मणितलें निवृत्तिदासें ।
माझें हीं जी ऐसें । मनोगत ॥ ६४६ ॥

यावरि आतां तुह्मीं । आज्ञापिलां स्वामी ।
तरि वायां चि वाग्मी । वाढों नेंदि ॥ ६४७ ॥

एवं यें अवधारा । ज्ञानलक्षणें अठरा ।
श्रीकृष्णें धनुर्द्धरा । निरोपिलीं ॥ ६४८ ॥

ज्या ज्ञानाच्या थोड्या प्राप्तीकरतां योगाभ्यासादी कष्ट लोक घेतात
त्या ज्ञानाचे एवढे निरूपण तू केलेस त्या मुळें आमचे मनाची तृप्ती झाली.

अमृतवर्षावाची सात दिवस सतत झड लागो तरी त्याला कोणी कंटाळेल
काय ? सुखाचे दिवस कोट्यवधी गेले तरी त्यांना कोणी मोजतो काय ?

पौर्णिमेची रात्र जरी एक सबंध युगभर टिकली,
तरी चकोरांना ती संपावी, असें कधीं वाटेल तरी का ?

त्याप्रमाणेंच ज्ञानाचा विषय आणि असले रसाळ निरूपण,
ते होत असलेले ऐकत असता, आता पुरे, असे कोण म्हणेल ?

आणि भाग्यशाली पाहुणा आला आणि जेवूं वाढणारीही भाग्यवती
असली, म्हणजे जसें जेवण कितीही लांबलें तरी थोडेंच वाटतें.

त्याचप्रमाणें आजचा हा प्रसंग आहे. कारण, आधींच आम्हांला
ज्ञानाची आवड असून तुलाही तें सांगण्याविषयीं उत्सुकता आहे.

म्हणून या तुझ्या व्याख्यानामुळे आमची ज्ञानस्मृती चौपट दृढ झाली आहे,
म्हणून तूं ज्ञानद्रष्टा आहेस, असें म्हटल्यावांचून आम्हांस राहावत नाहीं.

आतां आपल्या बुद्धीच्या माजघरात आपल्या शुद्धबुद्धीच्या स्फूर्तीचा आश्रय
करून अज्ञानं यदतोऽन्यथा, या पदाचें यथास्थित निरूपण कर, पाहूं

हें संतांचें भाषण ऐकल्यावर, निवृत्तिदास
ज्ञानदेव म्हणाले माझाही हेतू असाच आहे,

तशांत तुम्हां समर्थ संतांचीही तशीच आज्ञा झाली आहे. तेव्हा
मी जास्त वाणीविस्तर करीत नाही व गीतार्थ नेमका सांगतो.

या प्रमाणें ज्ञानाचीं हीं अठरा लक्षणें
श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलीं.

मग ह्मणे या नावें । ज्ञान येथ जाणावें ।
हें स्वमतें आघवे । ज्ञानिये ह्मणति ॥ ६४९ ॥

करतळावरि वाटुका । डोलत देखिजे जेवि आवळा ।
तैसें ज्ञानें डोळां । आह्मीं दाविलें तुज ॥ ६५० ॥

आतां जैं महामती । अज्ञान ऐसी वदंती ।
तेही सांघो व्यक्ती । लक्षणीं गा ॥ ६५१ ॥

यऱ्हविं ज्ञान फुडें जालेयां । अज्ञान जाणवे धनंजया ।
जें ज्ञान नव्हे तें आपैसेया । अज्ञान चि ॥ ६५२ ॥

पाहे पां देऊँ आघवा चि भरे । मग रात्री चि वोवि उरे ।
वांचूनु काहिं तिसरें । नाहिं जेवि ॥ ६५३ ॥

तैसें ज्ञंन जेथ नाहिं । तें चि अज्ञान पाहिं ।
तरि सांघों काहिं काहिं । चिन्हें तियें ॥ ६५४ ॥

तरि संभावने जिये । जो मानाची वाट पाहे ।
सत्कारें होये । तोषु जेया ॥ ६५५ ॥

गर्वें पर्वताचिं सिखरें । तैसा महत्वावरौनि नुतरे ।
तेयाचां ठांइं पुरें । अज्ञान असे ॥ ६५६ ॥

आणि स्वधर्माची मागवेलि । बांधे वाचेचा पिंपळिं ।
उभिला जैसा देउळिं । जाणौनि कुंचा ॥ ६५७ ॥

घाली विद्येचा पसारा । सुये सुकृताचा डांगोरा ।
करी तेतुलें मोहरा । स्फीतीचेया ॥ ६५८ ॥

आंग वरि चर्ची । जनांतें वंची ।
तो जाण अज्ञानाची । खाणी येथ ॥ ६५९ ॥



मग भगवान म्हणतात अर्जुना ! या लक्षणांनी ज्ञान
ओळखावे असे माझे मत आहे. आणि ज्ञानीही तसेंच म्हणतात.

तळहातावर डोलत असलेला आंवळा स्पष्ट पाहातां येतो, तसेंच
अर्जुना मी तुला ज्ञान हे डोळ्यांनी दिसेल असे स्पष्ट दाखविले,

हे महाबुद्धिमाता अर्जुना, आता यापुढे ज्याला लोकात
अज्ञान म्हणतात, तेहि त्याच्या लक्षणासह स्पष्ट सांगतो,

धनंजया, ज्ञान समजल्यावर अज्ञान सहज ओळखतां येतें.
कारण कीं, जें ज्ञान नाहीं तें आपोआप अज्ञानच आहे.

हे पहा अर्जुना ! संपूर्ण दिवस संपला की रात्र
आपोआप येते. या दोहोवाचून तिसरे जसे काहीच नसते,

त्याप्रमाणें, ज्या ठिकाणीं ज्ञान नाहीं, तें अज्ञानच
समज; तरी पण या अज्ञानाची काही लक्षणे सांगतो.

आपली प्रतिष्ठा व्हावी या हेतूनेच जगत असतो, जो मानाची वाट
पहात असतो, व लोकांनी आपला सत्कार केला म्हणजे संतोष पावतो;

पर्वताच्या शिखरासारखा गर्वानें ताठल्यामुळें मोठ्या पदवीवरून
कधींही खालीं उतरत नाहीं, त्याचे ठिकाणी पूर्ण अज्ञान आहे असे समज.

देवळामध्यें जसें मोर्चेल सर्वांना दिसेलशा जागीं उभें करून ठेवलेलं असतें,
तसा तो स्वधर्माचा मुंजाचा करगोटा आपल्या वाचारूपी पिंपळाला बांधतो;

आपण अध्ययन केलेल्या विद्येचा जो पसारा मांडतो, केलेल्या पुण्यकर्माची;
दवंडी पिटतो ज्या पासून आपली प्रतिष्ठा वाढेल तीं कृत्यें नेहमीं करीत असतो;

स्वतःच्या अंगाला भस्म, गंध वगैरे लाकांना दिसेल, अशा तऱ्हेनें फांसतो लोक त्याची
पूजा करीत असतां तो त्यांची फसवणूक करतो, तो अज्ञानाची खाण आहे, असें समज.

आणि वन्हि वनिं विचरे । तेथ जळति जैसिं स्थावरें ।
तैसें जेयाचेनि आचारें । जगा दुःख ॥ ६६० ॥

कर्वतिकें जे जल्पे । तें साबळाहुनु रुपे ।
विषाहुनु संकल्पें । मारकु जो ॥ ६६१ ॥

तेयातें बहू अज्ञान । तो अज्ञानाचें चि निधान ।
हिंसेसि आयतन । जेयाचें जीणें ॥ ६६२ ॥

आणि फुंकें भाति फुगे । रेचिली सवें चि उफगे ।
तैसा संयोगवियोगें । चढे वोहटे ॥ ६६३ ॥

पडिली वारेयाचां वळसां । धूळि चढे आकाशा ।
हरिषा वळघे तैसा । स्तुतिवेळे ॥ ६६४ ॥

निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके ।
थेंबें विरे वारेनि शोके । चिखलु जैसा ॥ ६६५ ॥

तैसा मानापमानिं होये । जो कोण्ही उर्मी न साहे ।
तेयाचां ठांइं आहे । अज्ञान पुरें ॥ ६६६ ॥

आणि जेयाचां मनिं गांठि । वरि मोकळी वाचा दीठि ।
आंगें मीतलें जीवें पाठि । भलतेया दे ॥ ६६७ ॥

व्याधाचें चारा घालणें । तैसें प्रांजळ जोगावणें ।
चांगाचें अंतष्करणें । विरूं करि ॥ ६६८ ॥

गार सेवाळें गुंडाळली । कां निंबोळी जैसी पीकली ।
तैसी जेयाची भली । बाह्यक्रिया ॥ ६६९ ॥

अज्ञान तेयाचां ठांइं । ठेविलें असे पाहिं ।
या बोला आन नाहिं । सत्य माझें ॥ ६७० ॥

ज्याप्रमाणें रानांत वणवा पेटल्याबरोबर जसे वृक्षवल्लींसवें प्राणीही
जळून जातात, त्याप्रमाणें ज्याच्या आचरणापासून सर्व जगास दुःख होतें,

ज्याचें सहज बोलणेंही ते भाल्यापेक्षां जास्त तीक्ष्ण टोंचते आणि
त्यातील त्याच्या गर्भित हेतूकडे पाहता, ते विषापेक्षाहि मारक वाटते.

आणि ज्याचें जगणें हिंसेचें घरच असतें, त्याचे ठिकाणी
प्रबल अज्ञान असून तो अज्ञानाचे भांडारच आहे.

आणि भाता फुंकला म्हणजे जसा तो वाऱ्यानें फुगतो, व सोडला असता लगेच रिकामा
होतो, तसा लाभ झाला असता जो चढून जातो व तिचा वियोग झाला असता तो खिन्न होतो,

वावटळींत सांपडलेली धूळ ज्याप्रमाणें आकाशांत उडते,
तसा कोणी स्तुती केली असतां जो आनंदाने चढून जातो;

परंतु जराशी निंदा कानीं पडली म्हणजे जो कपाळ धरून बसतो जसा
चिखल पाण्याच्या एका थेंबानें विरघळतो व थोड्याशा वाऱ्याने तो वाळतो;

तसेंच ज्याला मान अपमान हे दोन्ही सहन होत नाहींत, जो कुठलाही विकाराचा
वेग सहन करूं शकत नाहीं त्याचे ठिकाणी पूर्ण अज्ञान आहे, असे समज.

आणि जो आंतल्या गांठीचा आहे; ज्याचें बोलणें व पाहणें वरून मोकळ्या
मनाचें असतें व एकास वचन देऊन त्याचे उलट दुसऱ्यास मदत करतो;

पारध्याचे मृगास चारा घालणे दिखाऊ असते, त्याप्रमाणें जो दुसऱ्याला
प्रांजलपणाने वागण्यासारखे दाखवून जो चांगल्या माणसांचीं अंतःकरणें बिघडवतो.

शेवाळ्यानें आच्छादिलेली गारगोटी जशी वरून सुंदर दिसते किंवा पिकलेली
निंबोणी बाहेरून सुंदर दिसते तसे ज्याचें बाह्य आचरण दिसण्यांत चांगले असतें,

त्याच्या ठिकाणीं अज्ञान ठेवलेलें आहे असें समज.
हे म्हणणे अन्यथा नाही, सत्य आहे असे समज.

आणि गुरुकुळें जो लाजे । गुरुभक्ती उभजे ।
विद्या घेउनु माजे । गुरुसी चि ॥ ६७१ ॥

तेयाचें नांव घेणें । तें वाचेसि शूद्रान्न होणें ।
परि घडलें लक्षणें । बोलतां इयें ॥ ६७२ ॥

आतां गुरुभक्ताचें नांव घेऊँ । तें चि वाचेसि प्रायश्चित्त देऊँ ।
गुरुसेवकु पाहों । सूर्यु हा ॥ ६७३ ॥

एतुलेनि लागु पापाचा । निस्तरैल हे वाचा ।
जो गुरुलोपकाचा । पापिं घडला ॥ ६७४ ॥

हा ठाऊँवरि । तेया नांवाचें भय हरी ।
मग ह्मणे अवधारीं । आणिकें चिन्हें ॥ ६७५ ॥

आंगें कर्मे ढीला । जो मनें विकल्पें भरला ।
अडविचा अवगळला । कुहा जैसा ॥ ६७६ ॥

तेया तोंडिं कांटियडें । आंतु नसुदिं हाडें ।
आशुचि तेणे पाडें । सुबाह्यु जो ॥ ६७७ ॥

जैसें पोट पोसी सुणें । उघडें झांकलें न ह्मणे ।
तैसें आपुलें परावें नेणें । द्रव्यालागि ॥ ६७८ ॥

या ग्रामकोळाचां ठांइ । जैसा मिळणी ठाऊँ नाहिं ।
तैसा स्त्रीविषइं कांहिं । विचारीना ॥ ६७९ ॥

कर्माचा वेळु चूके । कां नित्यनैमित्यक ठाके ।
तें जेया न दूखे । जीवामाझि ॥ ६८० ॥

पापिं जो निसुगु । पुण्यिं अति निलागु ।
जेयाचा मनिं वेगु । विकल्पाचा ॥ ६८१ ॥



आणि गुरुकुलाचें नांव घ्यावयास त्याला लाज वाटते, गुरुभक्तीला
कंटाळतो गुरूपासून विद्याग्रहण करून त्याशींच जो उन्मत्तपणे वागतो;

अशा मनुष्याचे नांव घेणें म्हणजे शूद्राच्या घरीं अन्न सेवन करण्या सारखे आहे,
पण काय करावें ? अज्ञानाचीं लक्षणें सांगतांना त्याचा उच्चार करावा लागला.

आतां गुरुभक्तांचें नामस्मरण वाणीला प्रायश्चित्त देईन,
म्हणतों. कीं गुरुसेवकाचें नाव सूर्यासारखें पवित्र करणारें आहे.

गुरूची निंदा करणाराचें नाव घेण्यांत जें पातक घडलें, त्या पाप
संबंधापासून माझी वाणी केवळ गुरुभक्तांचे नाव घेतल्यानेच मुक्त होईल.

गुरुद्रोह्याचें नांव घेतल्यानें होणारे पांप दूर करतो. श्रीज्ञानेश्वर
महाराज म्हणतात, मग देव म्हणाले अज्ञानाची आणखी चिन्हे ऐक.

ज्याचें मन विकल्पानें भरलेलें असतें, तो
म्हणजे रानातल्या अमंगळ विहिरीप्रमाणें होय.

त्या रानांतील आडाच्या तोंडावर कांटे वगैरे घाण पडलेली असते आणि आंत
केवळ हाडें सांचलेली असतात, त्याप्रमाणे जो मनुष्य अंतर्बाह्य अशुद्ध असतो.

ज्या प्रमाणें कुत्रें पोटाला अन्न मिळविण्याकरितां उघड्या-झांकल्या अन्नाचा विचार
करीत नाहीं, त्याप्रमाणे जो धनाविषयी हे आपले की परक्याचे हा विचार करीत नाही,

या कुत्र्याच्या ठिकाणीं ज्या प्रमाणें संगाला योग्य किंवा अयोग्य
जागा हा विचार नसतो, तसा तो स्त्रीसंगाविषयीं निर्लज्ज असतो;

विहित कर्म करण्याची वेळ चुकली अथवा नित्यनैमित्तिक
करावयाचें राहीले तर त्याचें ज्याला मनांत दुःख वाटत नाही;

ज्याला पापाचरणाची लाज वाटत नाहीं, आणि पुण्यकर्माचा आपल्याशीं
कधी संबंध होऊ देत नाही. व ज्याचे मनांत संशय भरलेला असतो;

तो जाण निखळा । अज्ञानाचा पूतळा ।
जो बांधौनि असे डोळां । विन्यासातें ॥ ६८२ ॥

आणि स्वार्थें अळुमाळें । जो धीरापासौनि चळे ।
जैसें तृणबीज बळें । मुंगियेचेनि ॥ ६८३ ॥

पावो सूदलेया सवें । थिल्लर जैसें कालवे ।
तैसें भयाचेनि नावें । गजबजे जो ॥ ६८४ ॥

वायुचेनि अनुवायें । धूं दिगंतवेल्हीं जाये ।
दुःखवार्त्ता होये । तैसें जेया ॥ ६८५ ॥

मनोरथाचां धारसां । वाहवणें जेयाचेया मानसा ।
पुरीं पडला जैसा । दूधिया कां ॥ ६८६ ॥

वाउधणाचिया परि । जो आश्रयो केहीं न धरी ।
क्षेत्रिं तीर्थीं पुरीं । थारों नेणे ॥ ६८७ ॥

मातलेया सरडा । पुडुतिं बूढ पुडुतीं सेंडा ।
हिंडणवारा कोरडा । तैसा जेया ॥ ६८८ ॥

जैसा रोविलेयां उणें । रांजणु बैसों नेणे ।
तैसा पडे तरि राहाणें । यल्हविं हिंडे ॥ ६८९ ॥

तेयाचां ठांइं उदंड । अज्ञान असे उघड ।
जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ॥ ६९० ॥

आणि पैं धनुर्द्धरा । जेयाचेया अंतरा ।
नाहिं वोढावारा । संयमाचा ॥ ६९१ ॥

लेंडिये आला लोंढा । न मनी वाळुवेचा वरंडा ।
तैसा निषेधाचेया तोंडा । भिये ना जो ॥ ६९२ ॥

तो केवळ अज्ञानाचा पुतळाच होय. आणि जो
द्रव्यप्राप्ती विषयीं पापपुण्याची चाड बाळगीत नाहीं,

जसें मुंगीच्यानें तृणबीज जागा सोडून ढळूं शकतें, त्याप्रमाणें
जो अल्प लाभाकरितांही बुद्धीच्या स्थिरपणापासून ढळतो.

आणि पाय पडल्याबरोबर जसें डबकें ढवळून जातें,
तसा तो भयाचें नांव ऐकल्याबरोबर घाबरा होतो;

वायूच्या वेगानें धूर जसा दिशेच्या अंतापर्यंत पसरतो; त्याप्रमाणें
दुःखाची वार्ता ऐकल्याबरोबर ज्याचे चित्त अस्वस्थ होते,

पुरांत पडलेला भोपळा जसा हवा तिकडे वाहात
जातो, तसा जो मनोरथाच्या पुरांत वहात जातो,

वावटळ ज्याप्रमाणें कोठेंही स्थिर होत नाहीं; त्याप्रमाणें जो
क्षेत्राचे, तीर्थाचे किंवा शहराचे ठिकाणीं कोठेंही कायम रहात नाहीं

किंवा माजलेला सरडा ज्याप्रमाणें क्षणांत बूड, क्षणांत शेंडा असा
रिकाम्या खेपाकरतो, तसा हा नुसताच रिकामपणे भटकत असतो.

ज्या प्रमाणें रांजण जमिनींत रोवल्याशिवाय स्थिर राहात नाहीं,
तसा जो निद्रेशिवाय एके ठिकाणीं न राहतां चोहोकडे हिंडतो;

तो चंचलपणात माकडाचा भाऊच शोभेल ! त्याच्या
ठिकाणीं अज्ञान अगदीं भरपूर सांचलेलें असतें.

आणि याप्रमाणे अर्जुना ! ज्याच्या
अंतःकरणाला संयमाचा जरासुद्धा बांध नसतो.

ओहोळाला पूर आला असतां, तो लोंढा जसा वाळूच्या बांध्याला
जुमानीत नाही, तसा तो निषिद्ध कर्म करण्याकरितां भीत नाहीं.

व्रतातें आडमोडी । धर्माचे पाये उपडी ।
नियमाची आश तोडी । जेयाची क्रिया ॥ ६९३ ॥

नाहिं पापाचा कांटाळा । नेंदी पुण्यासि जीवाळा ।
लाजेचा पेंडवळा । खणौनि घाली ॥ ६९४ ॥

कुळेंसिं पाठिमोरा । वेदाज्ञेसि दुऱ्हा ।
कृत्याकृत्यव्यापारा । निवाडु नेणे ॥ ६९५ ॥

वसो जैसा मोकटु । वारा जैसा अफांटु ।
फुटला जैसा पाटु । निरंजनीं ॥ ६९६ ॥

आंधळें हातिरुं मातलें । कां डोंगरिं जैसें पेटलें ।
तैसें विषइं लागलें । चित्त जेयाचें ॥ ६९७ ॥

पैं उघडा काय न पडे । माकाटु कोणां नांतुडे ।
गांवदारिचें आडें । नोलांडी कवण ॥ ६९८ ॥

जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीक आलें ।
वाणसिये उभलें । कोण न रिगे ॥ ६९९ ॥

तैसें जेयाचें अंतःकरण । तेयाचां ठांइं संपूर्ण ।
अज्ञानाची जाण । रिद्धि असे ॥ ७०० ॥

आणि विषयांची गोडी । जो जींत मेला न संडी ।
स्वर्गिं हिं खावेया जोडि । येथौनि चि ॥ ७०१ ॥

जो अखंड भोगा जचे । जेया व्यसन कामक्रियेचें ।
मुख देखौनि विरक्ताचें । सचैल करी ॥ ७०२ ॥

विषो शणौनि जाए । परि न सिणे सावधु नोहे ।
जेणें कुहिला हातें चि खाये । कोढी जैसा ॥ ७०३ ॥

व्रतांना मध्येंच मोडतो, स्वधर्माची पायमल्ली करतो आणि
त्याचे वागणे नियमाने वागण्याची आशा तोडणारे असते,

ज्याला पापाचरणाचा कंटाळा नसतो; जो पुण्याला
आश्रय देत नाही आणि जो लज्जेची मर्यादा खणून टाकतो;

जो आपल्या कुळपरंपरेला जुमानीत नाहीं, वेदांच्या आज्ञेपासून दूर
जातो आणि कृत्य काय व अकृत्य काय याचा कधीं निर्णय जाणत नाहीं,

ज्याप्रमाणें पोळ मोकळा सुटलेला असतो, किंवा वारा जसा अफाट वाहत असतो,
अथवा अरण्यांत पाण्याचा फुटलेला पाट जसा पाहिजे तिकडे वाहत असतो;

आंधळा हत्ती माजावा, किंवा डोंगरास वणवा लागावा,
तसा याच्या चित्ताचा संचार विषयांमध्ये अमर्यादपणे होतो.

अरे उकिरड्यावर काय टाकलें जात नाहीं ? मोकळें सुटलेलें जनावर कोणास
सांपडत नाहीं ? गावाच्या द्वाराचा उंबरठा कोण कोण ओलांडीत नाहीं ?

जसें सदावर्तांतलें अन्न कुणालाही मिळतें, किंवा सामान्य माणसाला अधिकार
लाभल्यावर तो काहीही करतो, वेश्येचा उंबरठा कोणीही ओलांडू शकतो,

त्याप्रमाणें, ज्याचें अंतःकरण चंचल आहे, त्याचे ठिकाणीं
संपूर्ण अज्ञानाची पूर्ण भरभराट आहे असे जाण.

आणि विषयांची गोडी जो जिवंतपणीं अथवा मृत झाल्यावरही सोडीत नाहीं,
स्वर्गांत विषय भोगावयास मिळावे म्हणून त्याची इहलोकींच सिद्धता करून ठेवतो;

जो अखंड विषयभोगाकरता श्रमतो, आणि ज्याला काम्य कर्म
करण्याचें व्यसन असतें विरक्ताचें दर्शन होतांच जो सचैल स्नान करतो,

विषयसुद्धां थकतील; पण याचा हव्यास संपत नाही, आणि आपल्या कल्याणाविषयीं सावध
होत नाहीं; जसा कुष्टरोगी सडलेल्या हातांनींच खात असतो, कंटाळा करीत नाही,

खरी टेंको नेंदी उडे । लातौनि फोडी नाकाडें ।
तऱ्हीं जैसा न कढे । माघौता खरु ॥ ७०४ ॥

तैसा जो विषयांलागि । घाली जळतिये आगी ।
व्यसनचिं आंगिं । लेणिं मिरवी ॥ ७०५ ॥

फुटौनि पडे तंव । मृगु वाढवी हांव ।
परि न ह्मणे माव । रोहिणीची ॥ ७०६ ॥

तैसा जन्मौनि मृत्युवेऱ्हीं । विषइं त्रासितां बहु इं परीं ।
परि त्रासु नेघे धरी । अधिक प्रेम ॥ ७०७ ॥

पहिलिये बाळदशे । आई बा हें चि पिंसें ।
तें सरे मग स्त्रीमांसे । भुलौनि ठाके ॥ ७०८ ॥

मग स्त्री भोगितां थावों । वृद्धाप्यें लागे नेऊँ ।
मग तो चि प्रेमभाऊँ । बाळकां आणी ॥ ७०९ ॥

आंधळे वियालें जैसें । तैसिं बाळकें परिवसे ।
परि जिये तंव न त्रासे । विषयांसि जो ॥ ७१० ॥

जाण तेयाचां ठांइं । अज्ञानासि पारु नाहिं ।
आतां आणिकें हिं । चिन्हें सांघों ॥ ७११ ॥

तरि देह हें आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा ।
वळघौनियां कर्मा- । रंभ करी ॥ ७१२ ॥

आणि उणें कां पुरें । जें जें काहिं आचरे ।
तेयाचेनि आविष्कारें । कुंथो लागे ॥ ७१३ ॥

डोइये ठेविलेनि भोजें । देवलविंसें फुंजे ।
तैसा विद्यावयमाजें । उताणा चाले ॥ ७१४ ॥

ज्या प्रमाणें गाढवी स्पर्शही करूं देंत नाहीं, गाढवाला समागम करू देत नाही,
लाथा मारून नाकाडे फाडते, तरी पण गाढव कांहीं मगें म्हणुन सरत नाहीं,

जो विषयाकरितां जळत्या आगींत उडी घालतो आणि
आपल्या विषयभोगाच्या खुणा भूषणासारख्या मिरवितो,

छाती फुटून बेशुद्ध होईपयर्तंत मृग धांव घेत असतो, परंतु
हे जळ नव्हे, मृगजळाची माया आहे, हें मान्य करीत नाहीं.

तसा जन्मापासून मरेपर्यंत विषयांनी त्याला कितीही त्रास दिला
तरी त्या पासून दुःख न मानतां त्याविषयीं अधिक प्रेम बाळगतो.

प्रथम बालपणात आईबाप याचेच वेड लागून राहते.
तें वेड सरतें आणि मग स्त्रीदेहाच्या भुलींत गुंततो;

नंतर स्त्रीचा उपभोग पूर्ण झाल्यावर म्हातारपण
येऊं लागतें. तेव्हां तो तेंच प्रेम बालकाकडे वळवतो.

ज्याप्रमाणे आंधळे मूल जन्मले असता त्याला आई प्रेमाने गोंजारते,
तसा तो मुलाबाळांतच कालक्रमण करतो, तरी तो विषयांस विटत नाहीं,

अर्जुना, त्या पुरुषाच्या अज्ञानाला सीमाच नाहीं, असें
समज. आतां अज्ञानाचीं आणखीं कांहीं लक्षणें सांगतों.

देह हाच मी आत्मा होय, अशी दृढ बुद्धी
बाळगून जो कर्म करण्यास आरंभ करतो,

आणि जर एखादें कर्माचें आचरण कमी किंवा जास्त झालें तर तो पूर्ण
झालेल्या कर्मानें गर्वाने फुगतो व अपूर्ण झालेल्या कर्माबद्दल खेद करतो.

डोक्यावर ठेवलेल्या देवाच्या प्रतिमेमुळे जसा देवाचा भगत घुमूं लागतो,
तसा विद्या व तारुण्य यांच्या योगानें जो ताठून उताणा चालूं लागतो;

ह्मणे मीं चि येकु आथि । माझां चि घरिं संपत्ति ।
माझी आचरती रीती । कोण्हासि नाहिं ॥ ७१५ ॥

नाहिं माझेनि पाडें वाडु । मी चि सर्वज्ञु एकु रूढु ।
ऐसा शिवमुष्टिगंडु । घेउनु ठाके ॥ ७१६ ॥

व्याधिलेया माणसा । न ये भोगु दाखउं जैसा ।
नीकें न साहे तैसा । पुढिलांचें ॥ ७१७ ॥

पैं गुण तेतुला खाए । स्नेहें किं जळतु जाए ।
जेथ ठेविजे तेथ होए । मसी ऐसा ॥ ७१८ ॥

जीवनें तिडिपिडि । वीजिला प्राणु फेडी ।
लागला तरि काडी । उरों नेंदी ॥ ७१९ ॥

अळुमाळु प्रकाशु करी । तेतुलेनि उबारा धरी ।
तेया दीपाचेया परी । सुविद्यु जो ॥ ७२० ॥

वोखदाचेनि नावें अमृतें । जैसा नवज्वरु आबुथे ।
कां विख चि होउनि परते । सापा दूध ॥ ७२१ ॥

तैसा सद्गुणिं मत्सरु । वित्पत्तिअहंकारु ।
तपें ज्ञानें अपारु । ताठा चढे ॥ ७२२ ॥

अंत्यु राणिवे बैसला । कां आरें धारणु गीळिला ।
तैसा गर्वें फूगला । देखसी जो ॥ ७२३ ॥

जो लाठी ऐसा न लवे । पाथरु तैसा न द्रवें ।
गुणियांसि नांगवे । फोडसें जेवि ॥ ७२४ ॥

किंबहुना तेयापासिं । अज्ञान आहे वाढिसिं ।
हें निकरें गा तुजसिं । बोलत असों ॥ ७२५ ॥



आणि म्हणतो, माझ्या जोडीचा कोणीच नाहीं. माझ्याच घरीं सर्व
संपत्ति आहे माझ्याइतकें उत्तम आचरण दुसऱ्या कोणाचे तरी आहे काय ?

मजशीं तुलना करावी, असा श्रेष्ठ कोणी नाहीं, मी सर्वज्ञ असून मी एकटाच
या जगांत ज्ञाता आहें, अशा गर्वानें संतुष्ट झालेला ताठ होऊन राहतो.

व्याधिग्रस्त माणसाला जसें विषयभोग दाखवूं नयेत,
त्याप्रमाणें दुसऱ्याचे चांगले झालेलें ज्यास सहन होत नाहीं;

ज्याप्रमाणे दिवा जळताना जेवढी वात असते तेवढी
संपवितो, तेल जाळून टाकतो, जेथे ठेवावा तेथे काजळ करतो,

दिव्यावर पाणी उडवलें तर तो तडतडतो, वारा लागला तर विझून जातो;
पण कोठें सहज लागला तर घराची राखरांगोळी करून काहीही राहूं देत नाहीं,

आणि कोठें उगीच थोडासा प्रकाश करतो तर तेवढ्यानेंच
उष्णता वाढवितो, त्या दीपाप्रमाणें ज्याचें सुविद्यपण.

औषध म्हणून दूध घेतलें तर जसा नवज्वर विकोपाला जातो,
अथवा सर्पाला पाजलें असतां जसें त्या दुधांचे विष होतें,

त्याप्रमाणे गुणवान मनुष्याचा जो मत्सर करतो. स्वतःच्या पांडित्याने
अहंकार वाढतो, तप व ज्ञान असेल तर अमर्याद ताठा असतो.

अंत्यजाला राज्यावर बसविलें असतां तो जसा अभिमानानें फुगतो,
किंवा अजगरानें खांब गिळला तसा तो गर्वानें फुगलेला आंढळतो;

लाटण्याप्रमाणेंच जो लवत नाहीं, पाषाणाप्रमाणे ज्याचे
चित्त द्रवत नाही फुरशाचे विष मांत्रिकानेसुद्ध हटत नाही.

फार काय सांगावे अर्जुना ! त्याच्यापाशीं अज्ञान
वृद्धिंगत होत असते, हें तुला आम्ही निक्षून सांगतो.

आणि पैं धनंजया । जों देहगेहसामग्रिया ।
नेदखे चिं कालिचेया । जन्मातें गा ॥ ७२६ ॥

कृतघ्ना पेगु केला । चोरा वेव्हारु दीधला ।
निसुगु अस्ताविला । विसरे जेवि ॥ ७२७ ॥

वोढाळिवां लाइलें । तैसें कान पूंस वोलें ।
पुडुतिं वोढाळूं आलें । सुणें जेवि ॥ ७२८ ॥

बेडुकु सापाचां तोंडिं । जातसे सबडुबडी ।
तो मशकाचिया जोडी । स्मरे चि गा ॥ ७२९ ॥

तैसीं नवै द्वारें श्रवति । देहाची लूति जींति ।
जेणें जालीं तें चित्तीं । सळे ना जेया ॥ ७३० ॥

मातृकोदरकुहरिं । सूनि विष्टिचां दारिं ।
जठरिं नवमासवेळीं । उकढला जैं ॥ ७३१ ॥

ते गर्भिची व्यथा । कां जे जाली उपजतां ।
तें काहिं चि सर्वथा । नाठवी जो ॥ ७३२ ॥

मळमूत्रपंकिं । लोळतें बाळकें अंकिं ।
देखौनि जो न थूंकी । त्रासु नेघे ॥ ७३३ ॥

कळे चि ना जन्म गेलें । पाहे चि ना पुडुतिं आलें ।
ऐसेसें वाटलें । नाहिं जेया ॥ ७३४ ॥

आणि पैं तिया चि परी । जीविताची फरारी ।
देखौनि जो न करी । मृत्युचिंता ॥ ७३५ ॥

जीणेयाचेनि विश्वासें । मृत्यु येकु असे ।
हें जेयाचेनि मानसें । मानिजे ना ॥ ७३६ ॥



हे धनंजया, जो आपलें घरदार, संपत्ती, देह वगैरे
सामग्रीच्या योगानें मागील जन्माची आठवण ठेवीत नाहीं.

कृतघ्न मनुष्यावर केलेला उपकार, अथवा चोरास व्यापाराकरींता भांडवल
दिलें असता, अथवा कोडग्या पुरुषाची स्तुती केली असतां तो जशी ती विसरतो;

कुत्रें ओढाळपणानें शिरल्यामुळें कान व शेपूट कपून त्यास घराबाहेर
हांकलून लाविलें, तरी तें रक्त गळत असतांच जसें पुन्हा त्या घरांत शिरतें;

बेडूक सापाच्या तोंडांत सगळा गिळला जात असतांनाही पुन्हाः माश्यांचे
समूह गिळायची हाव धरतो, पण आपण मरतो, ही आठवण त्याला नसते;

तशीं शरीराचीं नऊही द्वारें पाझरत असून, व शरीराला झालेलें कुष्ठ अंगावर
प्रत्यक्ष असूनही, ज्यामुळें हें सगळे भोगावें लागलें, तें ज्याच्या मनीं स्मरत नाहीं,

आईच्या उदररूप गुहेंत विष्टेच्या थरांमध्यें
घालून, नवमासपर्यंत जो उकडून निघाला,

आईच्या गर्भाशयातील यातना तो विसरतो. किंवा उदरातून
बाहेर निघते समयीचे दुःख तें कांहींच जो मुळीं सुद्धां आठवीत नाहीं;

विष्ठा व मूत्र यांच्या घाणींत लोळणारे मूल अंकावर खेळवीत
असतां जो ना त्याची किळस घेत नाहीं, ना वीट मानी !

कालच तर एक जन्म गेला, व लागलीच पुन्हा उद्यां
दुसरा जन्म मिळणार, असें हें कांही ज्याला वाटलें नाहीं;

आणि त्याच प्रमाणें अयुष्याची भरभराट पाहून त्याच्या मनात
असे कधी येत नाही की अरेरे ! एक दिवस मला मरण येणार !

जगण्याचा त्याला इतका विश्वास असतो, की पुढें मृत्यु
येणार आहे याबद्दल ज्याचे मनांत बिलकूल विचार नसतो,

अल्पोदकिचा मासा । नाटे ऐसिया आशा ।
न वचे चि कां जैसा । अगाधा डोहा ॥ ७३७ ॥

कां गोरिचिया भूली । मृग व्याधा दीठि न घली ।
गळु न पाहतां गीळी । उंडी मीनु ॥ ७३८ ॥

दीपाचेया झगमगा । जाळील हें पतंगा ।
नेणवे चि पैं गा । जियापरि ॥ ७३९ ॥

कां गांवारु निद्रासुखें । घर जळत नेदखे ।
नेणतां जेवि विषें । रांधिलें अन्न ॥ ७४० ॥

तैसा जीविताचेनि मीसें । हा मृत्यु चि ना आला असे ।
हें नेदखे चिं राजसें । सुखें जाणा ॥ ७४१ ॥

शरीरिची वाढि । अहोरात्रिची जोडि ।
विषयसुखें प्रौढि । साच चि मानी ॥ ७४२ ॥

परि बापुडा ऐसा नेणे । जें वेश्येसि सर्वस्व देणें ।
तें चि नागवणें । रूप एथ ॥ ७४३ ॥

संचोराचें साजणें । तें चि तें प्राणु घेणें ।
लेपासि स्नपन करणें । तो चि नाशु ॥ ७४४ ॥

पांडू आंग सूटलें । तेया चि नांव खुंटलें ।
तैसें नेणे जें भूललें । आहारनिद्रा ॥ ७४५ ॥

सन्मुखा सूळा । धांवतेया पायळा ।
प्रतिपदिं जवळा । मृत्यु जेवि ॥ ७४६ ॥

तेवि देहा जंव जंव वाढु । जंव दीसांचा पवाडु ।
जंव जंव सुरवाडु । भोगाचा हा ॥ ७४७ ॥



हें डबकें कधीं आटणारच नाहीं, असा दृढ भरंवसा
धरून डबक्यांतला मासा, खोल डोहांत जात नाहीं,

किंवा गाण्याला भुलून हरिण जसें पारध्याला पाहाण्याचें
विसरतें, अथवा गळ न ध्यानीं घेता जसें माशानें आमिष गिळावें,

दिव्याच्या चकाकीनें, हा दिवा आपल्याला जाळील
असें न समजतां पतंग त्यावर झडप घालतो,

मूर्ख मनुष्य, झोपेच्या सुखापुढे घर जळत असलें, तरी तिकडे लक्ष
देत नाही, किंवा ठाऊक नसल्यामुळे विषमिश्रित अन्न मनुष्य खातो,

त्या प्रमाणे जगण्याच्या निमित्तानें हा मृत्यूच आला
आहे असें जो राजस सुखांत मग्न होऊन जाणत नाहीं;

शरीराची होत असलेली वाढ, दिवस व रात्र यांचा लाभ, आणि
विषयां पासून होणारी सुखाची प्रौढी, ह्या सर्व गोष्टी जो खऱ्याच मानतो;

परंतु ज्या बिचाऱ्या मूढाला कळत नाहीं, कीं वेश्येनें
आपल्याला सर्वस्व अर्पण करणें म्हणजेच आपला नाश आहे,

आपल्या सोबतीस संभावित असलेल्या चोराची मैत्री प्राणघेणी आहे, भिंतीवर
रंगानें काढलेल्या चित्राला, स्नान घालणें, म्हणजे त्याला नष्ट करणें.

पंडुरोगानें मनुष्य लठ्ठ झाला, म्हणजे तो सशक्त झाला नसून याचें मरण जवळ
आलें. त्याप्रमाणे आहार व निद्रा यात भुलून आयुष्य संपत आहे, हे जाणत नाही,

एखाद्याला सुळावर चढविण्याची शिक्षा दिली असता सूळ पाहिल्यावर
त्याकडे धावत जाऊं लागला तर त्याचा मृत्यू जसां झपाट्याने जवळ येईल,

त्या प्रमाणें जसजसा देह वाढेल, आयुष्य जों जों वृद्धिंगत
होईल, आणि जसजशी ही विषयभोगाची विपुलता होईल;

तंव तंव अधिकें । मरण आयुष्यातें जींके ।
मीठ जैसें उदकें । ग्रासिजत असे ॥ ७४८ ॥

तैसें जीवित जाये । तेया अस्तवे काळा पाहे ।
हें हातोहातीं नोहे । ठाउवें जेया ॥ ७४९ ॥

किंबहुना पांडवा । हा आंगिचा मृत्यु नीच नवा ।
नेदखे चि जो मावा । जिवितासा या ॥ ७५० ॥

तो अज्ञानदेशिचा राऊ । या बोला महाबाहो ।
न पडे गा वंटाऊ । आणिचा हा ॥ ७५१ ॥

पैं जीविताचेनि सुखें । जैसा कां मृत्युतें नेदखे ।
तैसा चि तारुण्याचेनि तोषें । जरेतें न गणी ॥ ७५२ ॥

कडाडिं लोटिला गाडा । शिखरौनि सूटला ढोंडा ।
तैसें नेदखे पुढां । वृधाप्य आहे ॥ ७५३ ॥

कां आडवोहळा पाणी आलें । ह्मैसेयाचें जूझ मातलें ।
तैसें तारुण्याचें चढलें । भुररें जेया ॥ ७५४ ॥

पुष्टि लागे विघरों । कांति पाहे निसरों ।
माथा आदरी सिरों । बागीबळ ॥ ७५५ ॥

दाढी साउळ धरि । मान हालउनि वारि ।
तऱ्हीं जो करी । प्रायेचा आवेशु ॥ ७५६ ॥

पुढील उरिं आदळे । नेदखे जैसें आंधळें ।
कां डोळेया वरिले निगळें । आळसी तोखे ॥ ७५७ ॥

तैसें तरुणेपण आजिचें । भोगितां वृद्धाप्य पाहिचें ।
नेदखे चि तो साचें । अज्ञानु गा ॥ ७५८ ॥



जसजसे दिवस जातात तसे मरण आयुष्याचा ऱ्हास करीत
असते, ज्या प्रमाणें मीठ पाण्यानें जसजसे ग्रासले जाईल;

त्याप्रमाणे जसजसे आयुष्य सरत जाते तसतसा मृत्यू जवळ येतो.
ही त्वरेनें एकसारखी चालू असलेली गोष्ट ज्याला कळत नाहीं;

अर्जुना, फार काय सांगावें ! हें शरीराचे नित्य नवें
मरण, हें ज्याला विषयांच्या भुलीनें समजत नाहीं;

हे महाबाहो अर्जुना, तो संपूर्ण अज्ञानदशेचा राजा होय; या बोलण्यांत
अज्ञानाची लक्षणे सांगण्यात आता काही उणीच राहीली नाही !

समृद्ध जीविताच्या संतोषांत मग्न असल्यामुळे जसा मृत्यूचे भान ठेवीत
नाही, तसाच तो तांरुण्याच्या तोऱ्यांत म्हतारपण हिशेबांत घेत नाहीं;

डोंगराच्या कड्यावरून लोटलेला गाडा किंवा डोंगराच्या माथ्यावरून घसरलेला
धोंडा, त्याप्रमाणे तारुण्याच्या मदाने पुढे म्हातारपण येणार, हे जाणत नाही,

किंवा जसें आडरानांतल्या ओहळाला पाणी चढावे किंवा माजलेल्या
रेड्यांची झुंज लावल्या प्रमाणें ज्याला तारुण्याची भुरळ चढलेली असते;

अंगाची पुष्टी कमी होऊ लागते, व शरीरांतील तेज
कमी होऊं लागते व मस्तक कंपाचा स्वीकार करते,

दाढी पांढरी होते, मान हालू लागून, नाही नाही म्हणते;
तरी तो प्रिय भासणांऱ्या वस्तूंचा पसारा वाढवितो.

पुढें असलेला पदार्थ उरावर आदळेपर्यंत, जसें आंधळ्याला त्याचें भान होत
नाहीं, आणि जसा एखादा आळशीपणाने डोळ्यांतील चिपाडेसुद्धा काढति नाही,

त्याप्रमाणे तारुण्याचा उपभोग घेत असतां उद्यांचें येणारे
म्हातारपण जो पाहत नाहीं, असा पुरुष म्हणजे मूर्तिमंत अज्ञान होय.

देखे अक्षमें कुबुजें । किं विपलावों लागे फुंजे ।
परि नेणे पाहे माझे । हे चि भावे ॥ ७५९ ॥

आंगिं वृद्धाप्याची । संज्ञा एउनि मरावें चि ।
परि जेया तारुण्याची । भूलि न फिटे ॥ ७६० ॥

तो अज्ञानाचें घर । हें साच चि घे उत्तर ।
तेवि चि परियसैं थोर । चिन्ह आणिक ॥ ७६१ ॥

तरि वाघाचिये आडवे । येकोळ चरौनि आला दैवें ।
तेणें विश्वासें पुडुतिं धांवे । वसो जैसा ॥ ७६२ ॥

कां सर्प घराआंतु । आवचटें देवो गेला स्वस्थु ।
येतुलियासाठिं निश्चंतु । नास्तिकु होए ॥ ७६३ ॥

तैसेनि टंवच दियें । येक दोनि चि वेळ लाहे ।
येथ लागु एकु आहे । हें मानी ना जो ॥ ७६४ ॥

वैरियां नीद आली । आणि दंदें माझि सरलीं ।
हें मानी तो सपीली । मूकला जेवि ॥ ७६५ ॥

तैसी आहारनिद्रेची उजिरी । रोग निवांत जंववेरीं ।
तंव जो न करी । व्याधिचिंता ॥ ७६६ ॥

आणि स्त्रीपुत्रादिमेळें । संपति जंव फळे ।
तेणें रजें डाळे । जाति जेयाचे ॥ ७६७ ॥

सवळे चि वियोगु पडैल । विळोनि विपत्ति होइल ।
हें दुःख पुढैल । नेदखे जो ॥ ७६८ ॥

तो अज्ञानु गा पांडवा । तो ही तो चि जाणावा ।
जो इंद्रियें अव्हासव्हा । चारी एथ ॥ ७६९ ॥



आंधळ्या किंवा कुबड्या माणसांकडे पाहून तो त्यांस गर्वानें वेडावूं
लागतो; पण माझेही उद्या असेच होईल, असे जो लक्षात घेत नाही,

आणि मरणाची खूण जें म्हातारपण, त्याची लक्षणें अंगावर
दिसूं लागलीं असतांही ज्याचा तारुण्याचा भ्रम दूर होत नाहीं;

तो पुरुष अज्ञानाचे माहेरघर समजावा. हें बोलणें खरे
मान. तसेच आणखीही अज्ञानाची महत्वाची लक्षणे ऐक.

वाघाच्या रानांत चरून चरून बैल सुदैवाने बचावून आल्यावर वाघ आपल्यास कांही
करीत नाहीं या विश्वासानें तो ज्याप्रमाणें त्या रानत फिरून चरावयास जातो;

अथवा ज्या घरांतील संपत्तीवर सर्प बसला आहे, त्या घरांतील ठेवा सर्पदंश न होता
एखाद्यानें परत आणलां म्हणून तेवढ्याच पराक्रमामुळें नास्तिक जसा निश्चिंत होतो,

त्याचप्रमाणे त्याला सुदैवाने उत्तम आरोग्य प्राप्त झालेले असले तर तेवढ्यावरच
या शरीरांत रोग म्हणून कांहीं एक आहे, ही गोष्ट जो मानीतच नाहीं;

वैरी निजला आहे, म्हणून आतां माझें वैर संपले, असें जर कोणी मानील, तर
तो वैरी जागृत झाल्यावर हा ज्याप्रमाणें आपल्या मुलांबाळांसह जीवास मुकेल.

त्या प्रमाणे आहार व निद्रा ही जेथपर्यंत यवस्थित चालू आहेत जोंपर्यंत
रोगाचा पगडा बसला नाहीं, तोंवर जो व्याधींची चिंता करीत नाही.

आणि स्त्री, पुत्र, इत्यादिकांच्या परिवारासह जसजशी भरभराट होत
असते तसतसा त्या संपत्तीच्या धुरानें ज्याच्यातील विचार नाहींसा होतो;

या स्त्रीपुत्रादि व संपत्ती यांचा तात्काळ वियोग होईल व एका
दिवसांत वाईट अवस्था येईल, हें पुढलें दुःख जो अगाऊ जाणत नाहीं;

अर्जुना ! तोही मूर्तिमंत अज्ञान आहे, असे समज, आणि
जो इंद्रियांना हवे ते विषय देतो, तो देखील अज्ञानीच समजावा.

वयसेचेनि उवायें । संपत्तिचेनि सावायें ।
सेवासव्य जाये । सरकटीतु ॥ ७७० ॥

न करावें तें करी । असंभ्याव्य मनी धरी ।
चिंतूं नये तें विवरी । जेयाची मति ॥ ७७१ ॥

रिगे तेथ न रिगावें । मागे जें नेघावें ।
स्परिसे जेथ न लगावें । आंग मन ॥ ७७२ ॥

न वचावें तेथ जाये । न पहावें तें पाहे ।
न खावें तें खाये । तेविं चि तोखे ॥ ७७३ ॥

न धरावा तो संगु । न लगावा तेथ लागु ।
न चरावा जो मार्गु । आचरे जो ॥ ७७४ ॥

नाइकावें तें आइके । न बोलावें तें भाखे ।
परि दोषु होईल हें नेदखे । प्रवर्त्ततां ॥ ७७५ ॥

आंगा मना रुची येयावें । येतुलें कृत्याकृत्य नाठवे ।
जो करणेयांचेनि नावें । भलेतें करी ॥ ७७६ ॥

परि पाप मज होईल । कां नरकयातना येइल ।
हें काहिं चि पुढैल । देखे ना जो ॥ ७७७ ॥

तेयाचेनि आंगलगें । अज्ञान जगिं दाटुगें ।
जें सज्ञानासि हि संगे । झोंबों शके ॥ ७७८ ॥

परि असो हें आइक । अज्ञानचिन्ह आणिक ।
कां तुज सम्यक । जाणवें जें ॥ ७७९ ॥

तरि जेयाची प्रीती पुरी । गुंतली देखसी घरिं ।
नवगंधकेसरिं । भ्रमरी जैसी ॥ ७८० ॥

जो तारुण्याच्या आवेशानें आणि संपत्तीच्या संगतीनें, सेव्यासेव्य
वस्तूंचा विचार न करितां सरसकट त्यांचा उपभोग घेतो;

जी गोष्ट करूं नये ती करतो, जें असंभवनीय आहे त्याची आशा
धरतों, ज्याचा विचार करू नये त्याचांच ज्याची बुद्धी विचार करते,

जेथें प्रवेश करूं नये, तेथें प्रवेश करतो; जी वस्तू घेऊं नये ती
मागतो, जेथे अंगाने किंवा मनानेही स्पर्श करू नये तेथे स्पर्श करतो,

जेथें जाऊ नये तेथें जातो, पाहू नये तें पाहतो,
खाऊं नये तें खातो, आणि त्यानें संतुष्ट होतो.

ज्याचा संग नको त्याचाच संग धरतो, जेथें संबंध करूं नये, तेथें
संबंध करतो आणि ज्या मार्गाचे आचरण करूं नये तो मार्ग आचरतो;

जें ऐकू नये तें ऐकतो, बोलूं नये ते बडबडतो, पण असे
करीत असताना आपल्याला दोष होतील हे तो जाणत नाही,

अर्जुना, केवळ मनाला रुचतें, इतक्याचसाठीं जो, तें कृत्य आहे कीं अकृत्य आहे
याचा तो कांहीं विचार करीत नाहीं जो कृतीच्या नांवें भलतें कांहीं करून बसतो.

परंतु आंपले हातून पाप घडेल, किंवा आपल्याला नरकयातना
सोसाव्या लागतील, या पुढील होणाऱ्या गोष्टी जो कांहींच पाहत नाहीं;

त्या धर्मभ्रष्टाच्या संगतीनें सर्व जगांत अतिशय अज्ञान पसरतें;
त्याचा संग झाला असता ज्ञानी पुरुषालाही ते झोंबू शकते,

पण हें असो; ज्या योगाने तुला अज्ञानाचें स्वरूप स्पष्ट
समजेल म्हणून आणखी कांहीं चिन्हें सांगतों, तीं ऐक.

नव्यासुगंधाने युक्त अशा कमळाच्या केसराचे ठिकाणी जशी भ्रमरी
गुंतून राहते, त्याप्रमाणें ज्याची प्रीती घरावर जडलेली असते,

साकरेचिये रासी । बैसली नुडे मासी ।
तैसें निषण्ण आवसिं । जेयाचें मन ॥ ७८१ ॥

ठेला भेड बेडुकु अडीं । मशकु गुपंला सेंबुडी ।
ढोर सबडबुडीं । पंकिं गेला ॥ ७८२ ॥

तैसें घरौनि निगणें । नाहिं जींतेनि मरणें ।
तेया सापां होउनि असणें । भाटिं तिये ॥ ७८३ ॥

प्रियोत्तमाचां कंठि । प्रमदा घे आंटी ।
तैसा जीवेंसिं कोंपटी । धरुनि जो ठाके ॥ ७८४ ॥

मधूरसादोषें । मधुकरि जचे जैसें ।
गृहसंगोपन तैसें । करी जो गा ॥ ७८५ ॥

ह्मांतारपणिं जालें । माणिक एक उपाइलें ।
तेयाचें कां जेतुलें । मातापितरां ॥ ७८६ ॥

तेतुलेनि पाडें पार्था । घरिं जेयाची आस्था ।
आणि स्त्रीवांचौवि सर्वथा । जाणे ना जो ॥ ७८७ ॥

महापुरुषाचें चित्त । जालेयां वस्तुगत ।
ठाके व्यवहारजात । जेयापरिं ॥ ७८८ ॥

तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडौनियां सर्वभावें ।
कोणु मी काय करावें । हें काहिं नेणे ॥ ७८९ ॥

हाणि लाभु नदेखें । लोकापवादु नाइके ।
जेयाचिं इंद्रियें एकमुखें । स्त्रिया केलीं ॥ ७९० ॥

चित्त आराधी स्त्रियेचे । स्त्रियेचेनि संदें नाचे ।
मर्कट गारुडियाचें । जैसें होए ॥ ७९१ ॥



साखरेच्या ढिगावर बसलेली माशी जशी उठत नाहीं, त्याप्रमाणें
ज्याचे मन स्त्रीचित्ताचे ठिकाणी अंसक्त होऊन राहते,

ज्याप्रमाणें बेडूक पाण्याच्या कुंडांतून बाहेर पडत नाहीं, अथवा चिलट जसे शेंबडांत
गुंतलेले असतें, किंवा जनावर चिखलांत रुतल्यावर बाहेर निघूं शकत नाहीं,

त्या प्रमाणें जिवंतपणीं अथवा मेल्यावर, जो घरांतून बाहेर
पडत नाहीं व जो मेल्यावर त्या जागेंत सर्प होऊन असतो;

स्त्री आपल्या प्रिय पतीच्या गळ्याला जशी मिठी मारते,
तसा जो जीवें भावें आपल्या खोपटीला घरून बसतो;

मध मिळविण्याच्या उद्देशानें मधमाशी जशी श्रमते,
त्याप्रमाणे कष्ट करून जो घराचे संगोपन करतो,

म्हातारपणीं दैवयोगानें जर एकुलतें पुत्ररत्न झालें,
म्हणजे त्याच्या आईबापांचे जितके त्याच्यावर प्रेम असतें,

तितकें ज्याचे प्रेम घरावर असतें; आणि अर्जुना,
जो स्त्रीवांचून दुसरे कांहीं जाणतच नाहीं,

ज्याप्रमाणें सिद्ध पुरुषाचें चित्त ब्रह्मस्वरूपीं लीन
झाल्यावर त्याचे जसे सर्व व्यवहार बंद होतात,

त्या प्रमाणें स्त्रीच्या देहासाठी जीवन अर्पण करतो व
मी कोण व माझें कर्तव्य काय, हें कांहीं जो जाणत नाहीं;

ज्याची सर्व इंद्रिये स्त्रीने आपल्याकडे एकतंत्र केली, तो आपली हानी,
लोकलज्जा पाहत नाही व लोक काय म्हणतात इकडे लक्ष देत नाही,

स्त्रीच्या मर्जीची जो निरंतर आराधना करतो
गारुड्याचे माकड जसे गारोड्याच्या तंत्राने वागते,

आपण चि पासिं दावी । इष्टा मैत्रा दुरावी ।
मग कवडा चि वाढवी । लोभी जैसा ॥ ७९२ ॥

तैसें दानपुण्य खांची । गोत्रकुटुंबा वंची ।
परि बायणी स्त्रियेची । उणी हों नये ॥ ७९३ ॥

पूजितें दैवतें जोगावी । गुरुतें बोलें झांकवी ।
मायेबापा दावी । निदारपण ॥ ७९४ ॥

स्त्रियेचां तरि विखिं । भोगसंपत्ति अनेकी ।
आणिक वस्तु नीकी । जे जे देखे ॥ ७९५ ॥

प्रेमाथिलेनि भगतें । भजिजे कुळदेवतेतें ।
तैसा एकाग्रचित्तें । स्त्री जो उपासी ॥ ७९६ ॥

इयेते कोण्ही देखैल । इयेसि वेखासें जाइल ।
तरि युग चि बुडैल । ऐसें जेया ॥ ७९७ ॥

साच आणि चोख । तें स्त्रियेसी चि अशेष ।
एरीविषिं जोगावणुक । ते ही नाहिं ॥ ७९८ ॥

नाइटेयां भेण । न मोडी नागाची आण ।
तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥ ७९९ ॥

किंबहुना धनंजया । स्त्री चि सर्व जेया ।
आणि तियेचेया जालेया- । लागि प्रेम ॥ ८०० ॥

आणिक ही जें समस्त । तेथिचें संपत्तिजात ।
तें जीवाहून आप्त । मानी जो गा ॥ ८०१ ॥

तो अज्ञानासि मूळ । अज्ञाना तेणें बळ ।
हें असो केवळ । तें चि तो रूप ॥ ८०२ ॥



ज्या प्रमाणें एखादा लोभी पुरुष आपल्यालाही शिणवितो इष्टमित्रांचा
वाईटपणा घेतो, व लोभी माणसाप्रमाणे कवडी कवडी करून पैसा जमवितो.

त्या प्रमाणें जो दान व पुण्य करण्याचें कमी करतो, गोत्रजाना व कुटुंबातील
माणसांना फसवितो, परंतु स्त्रीची थैली भरण्यांत कमी पडूं देत नाहीं;

आपल्या आराध्यदेवतेची साधारण सेवा करतो, गुरुजींना
थापा मारून चकवतो, आणि आईबापांना दैन्य दाखवितो;

आणि स्त्रीविषयीं मात्र अनेक भोगसंपत्ती जुळवतो,
व जी जी म्हणून चांगली वस्तू दिसेल ती ती आणतो,

ज्याप्रमाणे प्रेमळ भक्ताने आपल्या कुलदेवतची उपासना
करावी, तसा एकाग्रचित्तानें जो स्त्रीची उपासना करतो,

स्त्रीकडे जर कोणी वांकड्या नजरेनें पाहील किंवा तिच्या
विरुद्ध जाईल, तर जगबूडच होईल, असें जो मानतो;

जे खरे चांगले असेल, ते संपूर्ण एका स्त्रियेकरता आणि
कुटुंबातील माणसांना निर्वाहापुरत्यासुद्धां जिनसा देत नाहीं.

नायटे होतील या भीतीने ज्याप्रमाणे नागाकरितां केलेला नवस मोडू नये,
तसाच जो स्त्रीची कोणतीही यःकश्चित् सूचना पुरी केल्यावांचून राहात नाहीं;

अर्जुना, फार काय सांगावें ? स्त्री हेंच ज्याचें सर्वस्व, असतें आणि
तिच्यापासून झालेल्या संततीच्याच वाट्याला ज्याचें प्रेम येतें;

अरे, तिची जी आणखीही सर्व चीजवस्तू
असेल ती जो जीवापलीकडील समजतो,

तो अज्ञानाला जन्म देणारे कारण असून त्याच्यामुळें अज्ञानाची
वृद्धी होते. एवढें कशाला ? अज्ञानाचे रूप म्हणजे तोच.

मातलिये सागरिं । फोकिलियां तरि ।
लाटांचां येरझारिं । आंदोळे जेवि ॥ ८०३ ॥

तैसी प्रिय वस्तु पावे । आणि सुखें जो उंचावे ।
तैसा अप्रियासवें । तळु खाए ॥ ८०४ ॥

ऐसी जेयाचां चित्तिं । वैषम्यसाम्याची वोखती ।
वाहे तो महामती । अज्ञानु गा ॥ ८०५ ॥

आणि माझां ठांइं भगति । फळालागि जेया आथि ।
धनदोसें विरगति । नटणे जेवि ॥ ८०६ ॥

कां कांताचां मानसिं । निगौनु स्वैरिणी जैसी ।
राहाटे आणिकेंसिं । जावेयालागि ॥ ८०७ ॥

तैसें मातें किरीटी । भजती गा पाउटी ।
करूनि जो दीठी । विषो सुये ॥ ८०८ ॥

आणि भजिनलेया वरि । तो विषयो न पवे जरि ।
सांडि ह्मणे तरि । आघवें टवाळ हें ॥ ८०९ ॥

कुणबटु कुळवाडी । तैसा आनु देऊँ मांडी ।
आदिलाची पिडी । करि तेयातें ॥ ८१० ॥

तेया गुरुमार्गा टेंके । जेयाचा सुगरवां देखे ।
तरि तेयाचा मंत्रु सीखे । एर नेघे ॥ ८११ ॥

प्रणिजातेंसिं निष्टुरु । स्थावरिं बहुत भरु ।
तेविं चि नाहिं एकसरु । निर्वाहो जेया ॥ ८१२ ॥

माझी मूर्त्ति आपजवी । ते घराचां कोनिं बैसवी ।
आणि देवादेवीं । यात्रे जाए ॥ ८१३ ॥



आणि खवळलेल्या समुद्रांत नाव मोकळी सोडली असतां,
ती जशी लाटाच्या येण्याजाण्याने हेलकावे खाते,

त्या प्रमाणे आवडती वस्तू प्राप्त झाली असतां, सुखानें जो
गगनाएवढा होतो, पण अप्रिय घडून आलें कीं रसातळास खचतो.

अशी ज्याच्या चित्तात विषमता व समता यांची
घालमेल असते, तो हे महामती अर्जुना, अज्ञान आहे.

आणि जो माझी भक्ती करतो, परंतु मनात फलाची इच्छा
धरतो; ती कशी तर जसें धनाच्या हेतून वैराग्याचें सोंग आणावें;

किंवा ज्याप्रमाणे जाराकडे जाता यावे म्हणून व्यभिचारिणी
स्त्री, पतीच्या मनासारखे वागल्यासारखे दाखविते,

तशी अर्जुना, जो माझी भक्ती करतो, व माझ्या
भजनाची पायरी करून विषयप्राप्तीकडे दृष्टी ठेवितो,

आणि माझे भजन करूनही इच्छित वस्तूचा लाभ झाला नाहीं, तर
ही सारी भक्ती निरर्थक आहे, असें म्हणून जो ती तत्काळ सोडून देतो;

शेतकरी कुणबी जसा निरनिराळ्या उद्योगांत व्यग्र असतो, त्याप्रमाणे जो
निरनिराळे देव मांडून आणि प्रत्येक नव्या देवाची पूर्वीच्या देवाप्रमाणेंच सेवा करतो;

एखाद्या गुरुसंप्रदायाचा विशेष थाटमाट पाहिला, त्या गुरुच्या संप्रदायावर
विश्वास ठेवतो त्याच्यापासूनच मंत्र घेतो, दुसऱ्या गुरुचा मंत्र घेऊ इच्छित नाही,

सचेतन प्राण्याशी जो निर्दयपणें वागतो, व पाषाणाच्या मूर्तीवर
विशेष प्रेम करतो; त्याच प्रमाणे ज्याच्या वागण्यांत एकनिष्ठता नसते.

तो माझी मूर्ती तयार करून आणतो व घरात एका कोपऱ्यात
ती बसवतो. व आपण देव देवी यांच्या यात्रेला जातो.

नीच आराधन माझें । काजीं कुळदेवतिं भजे ।
पर्वविशेषें भोजें । पूजा आन ॥ ८१४ ॥

माझें अधिष्टान घरीं । आणि चौसे आनाचे करी ।
पितरकार्यअवसरीं । पितरांचा होए ॥ ८१५ ॥

एकादशिचां दिसिं । जेतुला पाडु आमसिं ।
तेतुला चि निगांसि । पंचमीसिं ॥ ८१६ ॥

चौथि मोटकी पाहे । आणि गणेशाचा चि होए ।
चांऊदसिं ह्मणे माए । तूझा चि वो दूर्गे ॥ ८१७ ॥

नवमीतें मांडी । आणि बैसे नवचंडी ।
आदित्यावरि वाढी । भैरवां भरीं ॥ ८१८ ॥

पाठिं सोमवारु पावे । आणि बेलेंसिं लिंगा धांवे ।
ऐसें एकला चि आघवें । जोगावी जो ॥ ८१९ ॥

अखंड भजन करी । उगा न राहे क्षणभरी ।
आघवेनि गांवदारी । ऐहेव जैसी ॥ ८२० ॥

तैसेनि जो गा भगतु । वेखासिं सैरा धांवतु ।
जाण अज्ञानाचा मूर्त्तु । अवतारु तो ॥ ८२१ ॥

आणि एकांते चोखटें । तपोवने तीर्थें तटें ।
देखौनि जो वीटे । तो ही तो चि ॥ ८२२ ॥

आणि आत्मा गोचरु होए । ऐसी जे विद्या आहे ।
तें आइकौनु डौरु वाहे । विद्वांसु जो ॥ ८२३ ॥

उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे ।
अध्यात्मज्ञानाचे । मनीं चि नाहिं ॥ ८२४ ॥



नित्य माझी उपासना करतो, कार्यप्राप्तीकरितां कुलदेवतेची
पूजा करितो, कांही विशेष पर्व आलें, कीं मग त्याहून निराळे देव !

माझे अधिष्ठान त्याच्या देवघरात असूनही तो इतर देवतांसाठी
व्रते, वसा वगैरे घेतो. व श्राद्धकालीं पितरांची पूजा करितो;

एकादशीच्या दिवशीं जशी माझी भक्ती करितो,
तितकाच मान श्रावण शुद्ध पंचमीला जो नागांना देतो;

चतुर्थी आली रे आली की, तो गणेशाचा भक्त होतो व चतुर्दशीचे
दिवशीं देवीचे पूजन करून, आई दुर्गे मी तुझा आहे, असें म्हणतो.

नित्य कर्म व नैमित्तिक कर्मे टाकतो आणि मग नवचंडीच्या अनुष्ठानास बसतो
रविवार आला असता पात्रात खिचडी वाढून कालभैरवाला नैवेद्य दाखवितो.

नंतर सोमवार आला, कीं बेलपान घेऊन शिवलिंगाकडे धांव
मारतो; अशा प्रकारे तो नाना देवतांची संभावना करीत असतो.

गांवाच्या द्वाराशीं राहणारी वेश्या गांवकऱ्यांची भोगदासी, त्याप्रमाणे
जो क्षणभर उगा न राहता सर्व देवांचे अखंड भजन करणारा असतो,

तसा हा भक्त आपल्या स्वार्थाकरिता सैरावैरा धावत असतो
अर्जुना असा माणूस मूर्तिमंत अज्ञान आहे असें समजावें.

आणि उत्तम एकांतस्थानें, तपोवन, तीर्थ, नद्यांचे तीर इत्यादि एकांतातील
उत्तम स्थानेपाहून ज्याच्या मनाला वीट येतो, तो देखील अज्ञानीच आहे.

आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून देणारी अशी जी ब्रह्मविद्या त्याला आवडत नाही.
ती ऐकूं आली असतां जो शहाणा पुरुष हातात डमरू वाजवून तिचा उपहास करतो.

जो उपनिषदाकडे ढुंकूनही पाहात नाहीं, योगशास्त्र ज्याला
आवडत नाही आणि अध्यात्माकडे ज्याच्या मनाचा कलच नसतो;

आत्मचर्चा एकि आथि । ऐसिये बुद्धीची भींति ।
पाडूनि जेयाची मति । वोढाळ जाली ॥ ८२५ ॥

कर्मकांड तरि जाणे । मुखाद्गतें पुराणें ।
ज्योतिषिं तो ह्मणे । तैसे चि होए ॥ ८२६ ॥

शिल्पिं अतिनिपुणु । सूपशास्त्रिं प्रवीणु ।
विधि अथर्वणु । हातिं जेया ॥ ८२७ ॥

कोकिं नाहिं ठेलें । भरतु करी ह्मणितलें ।
आगम उपासिले । मूर्त्त होंति ॥ ८२८ ॥

नीति सुझे । वैदिक बुझे ।
काव्यनाटकिं दुजें । चतुर नाहिं ॥ ८२९ ॥

स्मृतीची चर्चा । डंषु जाणे गारुडाचा ।
निघंटु प्रज्ञेचा । पाइकु करीं ॥ ८३० ॥

व्याकरणिं चोखडा । तर्कीं अतिगाढा ।
एकिं अध्यात्मीं चि फुडा । जात्यंधु ॥ ८३१ ॥

तेंवांचूनु आघवां शास्त्रिं । सिद्धांतनिर्वाणसूत्री ।
परि जळो तें नक्षत्री । न पाहे गा ॥ ८३२ ॥

मोराचां आंगि असोसें । पिसें आहाति डोळसें ।
आणि एकली दीठि नसे । तैसें तें गा ॥ ८३३ ॥

जरि परमाणू एवडें । संजीवनीमूळ जोडे ।
तरि बहू गाडे । भरणें केवि ॥ ८३४ ॥

तैसें शास्त्रजात जाण । आघवें चि अप्रमाण ।
अध्यात्मज्ञानेंविण । ऐकलेनि ॥ ८३५ ॥



आत्मनिरूपण म्हणून कांहीएक महत्वाची गोष्ट आहे, अशा
श्रद्धेच्या कोटाला पाडून ज्याची बुद्धी स्वैर भटकणारी झाली आहे;

जो कर्मकांड पूर्णपणें जाणतो, ज्याला पुराणें तोंडपाठ आहेत,
जसे म्हणतो तसेच होते, असा फलजोतिष्यात जो पारंगत असतो.

शिल्पशास्त्रांत जो हुशार आहे, पाकशास्त्रांत प्रवीण आहे,
व अथर्वणवेदाचे विधी त्यास हस्तगत झालेले असतात.

कामशास्त्रात काही जाणावयाचे राहिले नाही, भारताचा त्याचा अभ्यास
चांगला असतो, व मंत्रशास्त्रही मूर्तिमंत त्याच्या स्वाधीन झालेले असतें.

ज्याला नीतीशास्त्र अवगत आहे, वैद्यशास्त्रांत जों निपुण आहे,
काव्य नाटक इत्यादि साहित्यात त्याच्यासारखा चतुर नाही,

जो स्मृतींची चिकित्सा करतो, तसेच गारुडविद्येचे मर्म तो जाणतो,
व वैदिक शब्दांच्या कोशाला तो आपल्या बुद्धीचा चाकर करतो.

व्याकरणशास्त्रांत ज्याचें ज्ञान अगाध आहे, तर्कशास्त्रांत फार
पटाईत असतो, परंतु एक आत्मज्ञानाविषयीं जो जन्मांध आहे.

अध्यात्मशास्त्र वगळून इतर शास्त्रांतील सिद्धान्तांच्या पूर्ततेचा धागा जो लावू शकतो;
पण जळो ते ज्ञान ! मूळ नक्षत्रीं जन्मलेल्या मुलाचें तोंड आईबापांनीं पाहूं नये, तसा तो.

मोराच्या अंगभर पिसें असतात आणि त्या पिसांवर डोळेही असतात, पण त्या पिसाच्या
डोळ्यामध्ये एक दृष्टी मात्र नसते; त्याप्रमाणें त्याची ती सर्व विद्यासंपन्नता होय.

मेलेल्या मनुष्यास जिवंत करणारी संजीवनी औषधीची मुळी जर परमाणू
एवढीही सांपडली, तर मग इतर गाडाभर मुळ्या करायच्या आहेत काय ?

उत्तम लक्षणें असून अल्पायुष्य असणें, अथवा शीर नसलेल्या धडास जसे
अलंकार घालावेत अथवा वधूवरांवांचून वरात काढणे ही विटंबना होय.

यालागि अर्जुना पाहिं । अध्यात्मज्ञानाचां ठांइ ।
जेया निश्चयबुद्धि नाहिं । शास्त्रमूढा ॥ ८३६ ॥

तेया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बिं विरुढलें ।
जेयाचिये वित्पती गेलें । अज्ञानवेलीं ॥ ८३७ ॥

तो जें जें बोले । तें अज्ञान चि फूललें ।
तेयांचे पुण्य तें फळलें । अज्ञान चि ॥ ८३८ ॥

अध्यात्मज्ञान कहिं । जेणें मानिलें चि नाहिं ।
तो ज्ञानार्थु न देखे काहीं । हें बोलावें असे ॥ ८३९ ॥

ऐली चि थडी न पवतां । पळे जो माघौता ।
तेया पैली तीरिची वार्त्ता । केवि जाणवे ॥ ८४० ॥

कां दारवठां चि जेयाचें । पाये बांधले साचे ।
तो केवि परिवरिचें । ठेविलें जाणे ॥ ८४१ ॥

तेवि अध्यात्मज्ञान जेया । अनोळख धनंजया ।
तेया ज्ञानार्थु देखावेया । काइ काज ॥ ८४२ ॥

ह्मणौनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें सार न देखे ।
हें सांगावें आंखें लेखें । न लगे तुज ॥ ८४३ ॥

जेधवा सगर्भे वढिलें । तेधवां चि पोटिचें धालें ।
तैसे मागिल पदें बोलिलें । तें चि होऐ ॥ ८४४ ॥

वांचूनु या वेगळें । रूप करणें हें न मिळे ।
घेइं आवंतिलें आंधळें । तैसें जालें ॥ ८४५ ॥

एवं इये उपरतीं । ज्ञानचिन्हें माघौतीं ।
अमानित्वादिप्रभृती । वाखाणिलीं ॥ ८४६ ॥

त्याप्रमाणेंच एका अध्यात्मशास्त्रावांचून इतर
सारीं शास्त्रें पूर्णपणे अप्रमाण आहेत असें समज.

त्याला शरीर जें प्राप्त झालें, तें म्हणजे अज्ञानरूपी बीजाला
फुटलेला अंकुर असतो. आणि त्याची विद्वत्ता ही अज्ञानाची वेल होय.

त्याचें प्रत्येक वचन अज्ञानाचा फुलोरा समजावा व त्याने
केलेले जे पुण्य हे अज्ञानच फळाला आले असे म्हणावे.

आणि ज्याची अध्यात्मज्ञानावबर श्रद्धा नाहीं; तो ज्ञानाचा
विषय जें ब्रह्म त्यास पाहत नाहीं, हे सांगितले पाहिजे काय ?

नदीच्या अलीकडच्या कांठाला आला नाहीं, तोंच जो माघारीं पळून
जातो, त्याला नदीच्या पलीकडच्या बेटाची खबर काय ठाऊक असणार ?

किंवा घरांत शिरतांना उंबऱ्यातच ज्याचें मस्तक कापून
खांचेंत दडपलें, तर तो घरांत काय ठेवलें आहे हें कसे पाहील ?

त्याचप्रमाणें, अर्जुना ज्याला अध्यात्मज्ञानाची मुळींच ओळख नाहीं,
त्याला ज्ञानाचा अर्थ जें ब्रह्म, ते जाणण्याला विषय होईल काय ?

म्हणुन अशा पुरुषाला ज्ञानाचें तत्त्व समजत नाहीं, त्याला आत्मज्ञान होत
नाही हें आतां अगदीं आंकडेमोड करून तुला सांगण्याची आवश्यकता नाहीं.

जेव्हां गरोदर स्त्रीला जेवूं घालावें, तेव्हां तिच्या पोटांतलें मूल सहजच तृप्त
होतें, याचप्रमाणें मागें सांगितलेल्या ज्ञानपदांत अज्ञानपदाचेंही विवरण होतेंच.

आंधळ्यास जेवणाचें आमंत्रण दिल्यावर तो बरोबर दुसऱ्या कुणा
डोळसाला घेऊन येतोच. तसे अज्ञानाचे वेगळे लक्षण करणे संभवत नाही,

याप्रमाणे उलट रीतीनें अमानित्वादि ज्ञान
लक्षणांच्या उलट अज्ञानाचीं लक्षणें समजू शकतात.

जियें ज्ञानपदें अठरा । केलियां एरि मोहरा ।
अज्ञान ऐसें आकारा । येथ आहे ॥ ८४७ ॥

मागां श्लोकाचेनि अर्द्धार्द्धें । ऐसें सांघितलें मुकुंदें ।
ना उपराठिं ज्ञानपदें । तें चि अज्ञान ॥ ८४८ ॥

ह्मणौनि इया वाहाणी । मियां केलीं उपलवणी ।
वांचौनि दूघा मेळउनि पाणी । फार कीजे ॥ ८४९ ॥

तैसें जी न बडबडीं । पदाची कोर न संडी ।
मूळध्वनिचिये वाढी । मिमित्त जालां ॥ ८५० ॥

तंव श्रोते ह्मणति राहे । कें परिहारा ठाऊँ आहे ।
भीसि कां वायां हें । कविपोषका ॥ ८५१ ॥

तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रकटें करीं ।
जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आह्मीं ॥ ८५२ ॥

तें देवाचें मनोगत । दावितु आहासि मूर्त्त ।
हें इं ह्मणतां चित्त । दाटैल तूझें ॥ ८५३ ॥

ह्मणौनि असो हें न बोलों । परि सवियां चि गा तोखलों ।
जें लोकत्रया मेळविलों । श्रवणसुखा ॥ ८५४ ॥

आतां यावरि । जें तो श्रीहरि ।
बोलिला तें करीं । कथन वेगां ॥ ८५५ ॥

या संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें ।
जी अवधारां ऐसें । बोलिले देऊँ ॥ ८५६ ॥

ह्मणे तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चयो आघवा ।
आइकिला तो जाणावा । अज्ञानभागु ॥ ८५७ ॥



तीं ज्ञानाची अठरा लक्षणें उलटपक्षीं लाविलीं
असतां सहज तीं आपोआपच अज्ञानाची लक्षणें होतात.

मागें अकराव्या श्लोकाच्या उत्तरार्धाच्या दुसऱ्या अर्धामध्यें श्रीकृष्णानें
सांगितले कींहीं ज्ञानपदें उलट केलीं कीं तेंच अज्ञान होय !

म्हणून या प्रकारानें मी अज्ञान-लक्षणांचा विस्तार केला.
नाहींतर दुधांत पाणी मिसळून जसें दूध वाढवावयाचें;

त्याचप्रमाणें, एक अक्षरही न सोडतां आणि व्यर्थ बडबड न करितां, परंतु
मूळ श्लोकांत जो अर्थ थोडक्यांत सांगीतला तोच मीं विस्तारानें सांगितला.

हे ऐकून श्रोते म्हणाले, हा खुलासा पुरे झाला. एवढा हा
परिहार द्यायला जागाच नाहीं, आणि तूं उगीच का भितोस ?

जे अभिप्राय आम्हीं गीतारूपी गुहेंत गुप्त ठेवले होते,
ते तू प्रकट कर, असे तुला भगवंतानीच सांगितले आहे,

ते देवांचे मनोगत आम्हांला तूं स्पष्ट करून सांगितलेंस
असे म्हटलें असतांही तुझे चित्त संकोचाने दाटून येईल.

म्हणून हें बोलत नाहीं; परन्तु सहजच संतोष झाला आहे. कारण
श्रवण सुखाच्या ज्ञानरूपी नौकेचा तूं आम्हांस योग करून दिला आहेस.

आतां यानंतर श्रीहरी काय म्हणाले,
तें आम्हाला लवकर कथन कर,

हें संतांचे वाक्य ऐकल्याबरोबर निवृत्तिदास ज्ञानदेव
म्हणाले, ऐका, भगवान नंतर काय म्हणाले ते ऐका.

देव म्हणतात, अर्जुना ! हा जो सर्व लक्षणांचा समुदाय
तू ऐकलास तो अज्ञानाचा भाग आहे, असे समज,

येया अज्ञानविभागा । पाठि देउनियां पैं गा ।
मग ज्ञानविषिं चांगा । दृढां होइजे ॥ ८५८ ॥

मग निर्वाळलेनि ज्ञानें । ज्ञेय भेटैल मनें ।
तें जाणावेया अर्जुनें । आश केली ॥ ८५९ ॥

तंव सर्वज्ञाचा राऊँ । ह्मणे जाणौनि तेयाचा भाऊँ ।
परिसैं गा ज्ञेयअभिप्राऊँ । सांघो आतां ॥ ८६० ॥

ह्या अज्ञानभागाकडे दुर्लक्ष करून तू
ज्ञानप्राप्तीविषयीं चांगला दृढनिश्चय करावास.

मग त्या शुद्ध ज्ञानाच्या योगें तुला ज्ञेयाची प्राप्ती
होईल, ते ज्ञेय स्वरूप जाणण्याची अर्जुनाने इच्छा केली.

मग यावर तो त्याचा भाव जाणून तो सर्वज्ञाचा राजा श्रीकृष्ण
म्हणाला, ऐक, आतां आम्हीं ज्ञेयाविषयींचा अभिप्राय सांगू.

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १३ ॥

ज्ञेयम्, यत्, तत्, प्रवक्ष्यामि, यत्, ज्ञात्वा, अमृतम्, अश्नुते,
अनादिमत्, परम्, ब्रह्म, न, सत्, तत्, न, असत्, उच्यते

जें ज्ञेय आहे व जें जाणलें असतां मनुष्य अमृतत्व पावतों तें तुला मी आतां सांगतो
तें आदिरहित परब्रह्म होय. त्याला सत् म्हणता येत नाही व असत्ही म्हणता येत नाही.

तरि ज्ञेय ऐसें ह्मणणें । वस्तूतें येणें चि कारणें ।
जें ज्ञानेंवांचूनि कव्हणें । उपाया न ये ॥ ८६१ ॥

आणि जाणितलेया वरौतें । जाणणें नाहिं जेथे ।
जें जाणणैं चि तन्मयते । आणी जेयाचें ॥ ८६२ ॥

जें जाणितलेयासाठिं । संसारा काढूनि कांठीं ।
जरौनि जाइजे पोटीं । नित्यानंदाचां ॥ ८६३ ॥

तें ज्ञेय गा ऐसें । आदि चि जेया नंसे ।
परब्रह्म आपैसें । नांव जेया ॥ ८६४ ॥

नाहिं ह्मणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे ।
विश्व ऐसे ह्मणिजे । तरि हे माया ॥ ८६५ ॥

रूप वर्णु व्यक्ति । नाहिं दृश्य द्रष्टा स्थिति ।
तरि कोणें कैसें आथि । ह्मणावें पां ॥ ८६६ ॥

तर ब्रह्माला ज्ञेय म्हणावयाचें, तें एवढ्याकरितां कीं, तें
ज्ञानावाचून इतर कोणत्याही उपायांनी प्राप्त होत नाहीं.

आणि त्याचे ज्ञान झाले असतां कांहीं कार्य उरत
नाहीं, व ज्याचें ज्ञान जाणणाराला ज्ञेयरूप करतें.

ज्याचे ज्ञान झाले असतां, मनुष्य संसाराचे काटेरी कुपंण कढून
टाकतो ज्ञान्याला नित्यानंदांत बुडी मारून त्यांत मिसळून जातां येतं,

अर्जुना ! ते ज्ञेय परब्रह्म उत्पत्तीरहित आहे, ते निरंतर
आहे, त्याला कांहीं तरी नाव पाहिजे म्हणून परब्रह्म म्हणतात.

तें नाहीं म्हणावें तर विश्वरूपानें प्रत्यक्ष दिसतें; आणि त्याला
विश्व म्हणावें, तर हें विश्व केवळ मायिक, अशाश्वत आहे.

त्या ब्रह्माच्या ठिकाणीं रूप, रंग व आकार हीं नाहींत आणि दृश्यत्व व
द्रष्टृत्व हेही भाव ज्याच्या ठायीं नाहींत, तर ते आहे हे कोण कसे म्हणणार ?